cmyk

## संपादकीय

### आज फैसलाः नवीन समिकरणे जन्माला येणार?

महाराष्ट्राच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेले आहे. बहुतांश संस्थांनी जे आपले प्राथमिक अंदाज किंवा एक्झिट पोल जाहीर केलेले आहेत, ते पाहता महाराष्ट्रामध्ये 'चौकानेवाले' निकाल येणार आहेत. आतापर्यंत दहा संस्थांनी जे अंदाज वर्तविले आहेत, त्यानुसार सहा संस्थांनी युतीचे सरकार पुन्हा सत्तेवर येईल, असा अंदाज वर्तवलेला आहे. तर चार संस्थांनी महाविकास आघाडी बहुमताने सत्तेवर येईल, असे म्हटले आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com


### राजधानी दिल्ली जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर

नवी दिल्ली : गेल्या काही दिवसांपासून दिल्लीची हवा अतिधोकादायक पातळीवर गेली आहे. बुधवारी (२० नोव्हेंबर) दुपारी चार वाजता दिल्लीची हवा गुणवत्ता निर्देशांक ४३८ वर गेला होता. दिल्लीची गणना जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर म्हणून होत आहे. जगातील पहिल्या दहा प्रदूषित शहरांमध्येही देशातील आठ शहरांचा समावेश होता. राष्ट्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार बुधवारी दुपारी ४ च्या आकडेवारीनुसार दिल्ली जगातील सर्वाधिक प्रदूषित शहर होते. दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक ४ वाजता ४३२ वर गेला होता. हवेत २.५ मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण २९१ तर १० मायक्रॉनच्या प्रदूषकांचे प्रमाण ४१३, कार्बन मोनोऑक्साईडचे प्रमाण १२२९ पीपीबी, सल्फर डायऑक्साईचे प्रमाण ५ पीपीबी, नायट्रोजन ऑक्साईडचे प्रमाण २८ पीपीबी, ओझोन १० पीपीबी होते.

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२११ | शनिवार, दि.२३ नोव्हेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने– ६ | किंमत ३ रूपये

# जीएम तेलबिया पिकांना परवानगी द्या!

## उद्योगांची मागणी ; खाद्य तेलाची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी उत्पादन वाढविण्याची गरज

**पुणे । प्रतिनिधी**

**पुढच्या ५ वर्षात देशातील खाद्यतेलाची मागणी उत्पादनापेक्षा जास्त वाढणार आहे. ही मागणी पूर्ण करण्यासाठी सरकारने जीएम तेलबिया पिकांना परवानगी द्यावी. सोयाबीनचे भाव हमीभावापेक्षा कमी असल्याने सरकारने खरेदीची गती वाढवावी. तसेच मोहरी पेंड निर्यातीला १५ टक्के सवलत द्यावी, अशी मागणी एसईएचे अध्यक्ष संजीव अस्थाना यांनी पत्राद्वारे केली आहे.**

सॉल्व्हेंट एक्सट्राक्टर्स असोसिएशन ऑफ इंडिया अर्थात एसईएचे अध्यक्ष संजीव अस्थाना यांनी सरकारला लिहिलेल्या पत्रात म्हटले आहे की, देशात तेलबिया उत्पादन तर वाढणारच आहे. पण खाद्यतेल मागणी मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. २०२९–३० मध्ये देशातील तेलबिया उत्पादन सध्याच्या



### तर उत्पादनात वाढ होईल

तेलबिया पिकांमध्ये जीएमला परवानगी दिल्यानंतर देशातील उत्पादन वाढीला मदत होईल. २००२ मध्ये भारताने कापसात जीएमला परवानगी दिली तेव्हा उत्पादन वाढले. तसेच सरकारने मोहरीसारख्या तेलबिया पिकांमध्ये जीएमला परावनगी दिल्यास देशातील उत्पादन वाढीला मदत होईल.

### सोयाबीन खरेदीची गती वाढवा

सरकारने हमीभावाने सोयाबीन खरेदीसाठी १२ टक्के ओलाव्याची अट शिथिल केली. ओलाव्याची अट आता १५ टक्के केली. हा निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र अजूनही बाजारभाव हा हमीभाव ४ हजार ८९२ रुपयांपेक्षा कमीच आहे. सध्या भाव ४ हजार २०० रुपयांच्या दरम्यान आहे. त्यामुळे सरकारने हमीभावाने सोयाबीन खरेदीची गती वाढवणे आवश्यक आहे, अशी मागणीही अस्थाना यांनी केली आहे.

३५० लाख टनांवरून वाढून ४५० ते ५०० लाख टनांवर पोहचेल. तर देशातील खाद्यतेलाचा वापर वर्षाला ३ टक्क्यांनी वाढून २८० ते ३०० लाख टनांवर पोचण्याची शक्यता आहे. ४ टक्क्यांनी वापर वाढला तर ३२० लाख टनांपर्यंतही वापर होईल. म्हणजेच वाढलेल्या लोकसंख्येबरोबर खाद्यतेलाचा ◀◀ पान २ वर

### तावडे यांच्याकडून गांधी, खर्गे, श्रीनेत यांना नोटीस

नवी दिल्लीः कॅश फॉर व्होट प्रकरणी भाजपचे सरचिटणीस विनोद तावडे यांनी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांना कायदेशीर नोटीस पाठवली आहे.

नोटीस मिळाल्यापासून २४ तासांच्या आत या तिन्ही नेत्यांनी विनोद तावडे यांची बिनशर्त माफी मागावी, असे त्यात म्हटले आहे. तसेच तीन इंग्रजी वृत्तपत्रे आणि तीन प्रादेशिक भाषेतील वृत्तपत्रांच्या पहिल्या पानांवर माफीनामा प्रसिद्ध करा. तसेच 'एक्स' वर माफीनामा पोस्ट करा. त्यांनी माफी न मागितल्यास तिन्ही नेत्यांवर ◀◀ पान २ वर

# कोण हिरो..कोण झिरो... आज होणार फैसला!

## दुपारपर्यंत निकाल हाती येण्याची शक्यता; केज सोडता माजलगाव, परळी, गेवराई, बीड, आष्टीकडे सर्वांचे लक्ष



**बीड । प्रतिनिधी**

**राज्यामध्ये सरकार कोणाचे येणार हे दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दुपारपर्यंत निश्चित होणार असून कोण हिरो.. कोण झिरो... याचा फैसला होणार असून केज मतदार संघ सोडता माजलगाव, परळी, गेवराई, बीड आणि आष्टीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.**

लोकसभा निकालानंतर राज्यामध्ये महायुतीला मोठा धक्का बसला होता. लोकसभा निकालाची धग विधानसभा निवडणुकी पर्यंत जाते की काय अशी भीती राज्य सरकारला होती. जरांगे फॅक्टर पुन्हा एकदा महायुती सरकारला अडचणीत आणण्याची शक्यता होती. लाडकी बहीण योजनेसह इतर महत्त्वाच्या योजना सुरू करून शिंदे सरकारने एक प्रकारे जरांगे फॅक्टरचा प्रभाव कमी करण्याचे काम केलं. बीड जिल्ह्यामध्ये लोकसभा निवडणुकीत पंकजा मुंडे यांचा जरांगे फॅक्टरमुळे पराभव झाला. विधानसभा निवडणुकीत महायुतीला पुन्हा धक्का बसतो की काय असे वाटत असताना प्रत्यक्षात मात्र जरांगे फॅक्टरचा प्रभाव पाहिजे तेवढा दिसून आला नाही. उलट केज हा राखीव मतदार संघ सोडता इतर सर्व विधानसभा मतदारसंघात माधव पॅटर्न चर्चा झाली. परळीमध्ये यांच्याविरोधात राजसाहेब देशमुख यांनी मैदान मारण्यासाठी ऑटोकाठ प्रयत्न केले मात्र त्यांचे ते प्रयत्न तोकडे ठरणार असल्याचे दिसते. परळी मधून धनंजय मुंडे विजयच्या दिशेने आगे कूच करत असून माजलगाव मतदार संघामध्ये ओबीसी नेते माधव निर्मळ यांना ओबीसींची चांगली मते झाल्याचा अंदाज आहे. तर अपक्ष रमेश आडसकर यांनी सुद्धा मराठा समाजाच्या आणि जरांगे समर्थकांच्या पाठिंबावर मुसंडी मारली आहे. आघाडीचे मोहन जगताप आणि महायुतीचे उमेदवार प्रकाश सोळंके यांची या निवडणुकीत चांगलीच दमछाक झाल्याचे दिसून आले. गेवराई विधानसभा मतदारसंघांमध्ये दोन्ही पंडितांसह पवार यांना सुद्धा मतांसाठी मोठा संघर्ष करावा लागल्याचे दिसले. वंचित बहुजन आघाडीच्या प्रियंका खेडकर यांच्यासाठी ◀◀ पान २ वर

# महायुती-महाविकास आघाडीकडून अपक्षांशी संपर्क

## नव्या पाहणीत महाविकास आघाडी काटावर, महायुती बहुमतापासून दूर

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील विधानसभा निवडणूकीसाठी मतदानाची प्रक्रिया पार पडल्यानंतर २३ नोव्हेंबर रोजी मतमोजणी पार पडत आहे. या मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर अनेक खासगी कंपन्यांनी एक्झिट पोलचे अंदाज जाहिर करत राज्यातील महायुती आणि महाविकास आघाडीला मिळणाऱ्या जागांचे अंदाज वर्तविले आहेत. यापैकी एखाद–दुसरा अपवाद वगळता बहुतांश एक्झिट पोल जाहिर करणाऱ्यांनी महायुतीच्या बाजूने विधानसभेतील बहुमताचा आकडा टाकला आहे. तर महाविकास आघाडीच्या बाजूने कमी जणांनी बहुमताचा अंदाज वर्तविला आहे.**



राज्यातील कोणत्या मतदारसंघात ◀◀ पान २ वर

### महायुती सगळ्याच तर आघाडी फक्त आपल्याच बंडखोरांच्या संपर्कात

राज्यातील मतदानाच्या आधारे महायुतीला १२० ते १३० इतकेच संख्याबळ मिळणार असल्याचे स्पष्ट होत आहे. तर महाविकास आघाडीचे १५० च्या आसपास आमदार निवडूण येणार असल्याची चर्चा सुरु आहे. त्यामुळे महायुतीकडून सर्वाधिक बंडखोर आणि अपक्ष आमदारांशी संपर्क साधण्याचे प्रयत्न करण्यात येत असून या अपक्ष–बंडखोरांना जास्तीत जास्त आमिषे दाखविण्याचा प्रयत्न केला जात आहे. महाविकास आघाडी १५० जागांवर विजय मिळणार असल्याबाबतचा आत्मविश्वास आहे. त्यामुळे महाविकास आघाडीकडून फक्त महाविकास आघाडीतील बंडखोरांशीच संपर्क साधण्याचा प्रयत्न सुरु असल्याचे सांगण्यात येत आहे. मात्र शनिवारी मतमोजणीत महायुतीला आणि महाविकास आघाडीला किती जागा मिळणार यावरच या अपक्ष आमदारांच्या पाठिंब्याची किंमत ठरणार आहे.

# एकाधिकारशाहीला कंटाळून शिंदे, पवार भाजपची साथ सोडणार?

**मुंबई । प्रतिनिधी**

**गेल्या अडीच ते तीन वर्षाच्या कार्यकाळामध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार यांना विकास कामे करताना मुभा दिली जात नसल्याच्या अनेक वेळा चर्चा झाल्या. त्यामुळे खऱ्या अर्थाने सर्वसामान्य जनतेची कामे करण्यात अडथळा येत असल्याने मोदी –शहा यांच्यासह देवेंद्र फडणवीस यांच्या एकाधिकारशाहीला कंटाळून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार हे भाजपची साथ सोडणार असल्याची जोरदार चर्चा आहे. त्यामुळे राज्याच्या**

## फडणवीसांचे स्वप्न भंगणार ;राज्याच्या राजकारणात वेगळी समीकरणे होण्याचे संकेत



**राजकारणात वेगळी समीकरणे जुळण्याची शक्यता आहे. तसेच मुख्यमंत्री होण्याचे देवेंद्र फडणवीस यांचे स्वप्नसुद्धा भंगण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

महाराष्ट्राच्या सत्तेचे सूत्रे कोणाच्या हाती दिली जाणार याचा फैसला दिनांक २३ नोव्हेंबर रोजी दुपारपर्यंत होणार आहे. लोकसभा निवडणुकीत महायुतीला मोठा दणका बसल्यानंतर विधानसभा निवडणुकीत ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२२ नोव्हेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहूः १.५० क्विंटल | २,९७१ | २,९७१ | २,९७१ |
| ज्वारी/हायब्रिड :२.५० क्विंटल | १,८०१ | २,१७१ | १,९८६ |
| मका/लोकलः ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,००० | ८,००० | ८,००० |
| उडीद : ३५.०० क्विंटल | ५,००० | ७,६०० | ६,६२७ |
| बाजरीः ५.०० क्विंटल | २,५७५ | २,८६५ | २,७२० |
| मुग : १.५० क्विंटल | ६,९५० | ७,२५१ | ७,१०० |
| सोयाबीनः ६६०.०० क्विंटल | ३,६०० | ४,२७१ | ४,१२९ |
| हरभराः १.५० क्विंटल | ६,८०१ | ७,७०० | ७,२५० |

# संख्याबळ मिळाल्यास सत्तेत जाणार-प्रकाश आंबेडकर

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणूकीच्या कालावधीत आणि लोकसभा निवडणूकी दरम्यान भाजपाप्रणित महायुती आणि राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस प्रणित महाविकास आघाडीपासून लांब राहणाऱ्या



वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख

प्रकाश आंबेडकर यांनी मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर मोठे वक्तव्य करत सत्ता स्थापन करू शकणाऱ्या सोबत राहणार असल्याचे जाहिर केले आहे.

विधानसभा निवडणूकीत महाविकास आघाडी आणि महायुतीकडून ◀◀ पान २ वर

# ब्रेकअप किंवा लग्नाचे वचन मोडले तर पुरुषावर अत्याचाराचा गुन्हा दाखल होऊ शकत नाही

## सुप्रीम कोर्टाचा महत्वपूर्ण निर्णय

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

पुरुष आणि स्त्री यांच्या नात्याबाबत सुप्रीम कोर्टाने एक महत्वाचा निर्णय दिला आहे. पुरुष आणि महिलेचे प्रेम संबंध आहेत आणि त्यांनी दिलेले लग्नाचे वचन मोडले किंवा ते वचन पूर्ण केले नाही तर, पुरुषावर लैंगिक अत्याचाराचा गुन्हा दाखल होऊ शकत नाही, असा महत्वाचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. एक प्रकरणावर सुनावणी करत असताना सुप्रीम कोर्टाने हा निर्णय दिला आहे. ◀◀ पान २ वर

# ला निना पुढच्या महिन्यात येणार?

## डिसेंबर ते फेब्रुवारी दरम्यान निर्मिती ; अपेक हवामान केंद्राचा अंदाज


**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**ला निना परिस्थिती निर्माण होणार याची चर्चा मागील काही महिन्यांपासून जोर धरत आहे. आता अपेक हवामान केंद्राने डिसेंबर ते फेब्रुवारी या काळात ला निना निर्माण होण्याची ६२ टक्के शक्यता असल्याचे म्हटले आहे.**

अपेक हवामान केंद्राने म्हटले आहे की, एपीसीसी एन्सो स्थिती ला निनाची शक्यता दर्शवित आहे. निनो ३.४ इंडेक्स जानेवारी २०२५ मध्ये उणे ०.८ सेल्सिअस राहण्याची अपेक्षा आहे. ही स्थिती वाढत जाऊन मे २०२५ पर्यंत उणे ०.३ सेल्सिअस होण्याची शक्यता आहे. ऑस्ट्रेलियाच्या हवामान विभागाच्या मते, इंडेक्स उणे ०.८ सेल्सिअसपर्यंत खाली येईल तेव्हा स्थिती ला निना पातळीवर येईल. ऑस्ट्रेलियन ब्युरो ऑफ मेटेरॉलॉजीच्या अंदाजानुसार ला निना स्थिती फेब्रुवारी २०२५ च्या आधीच निर्माण होण्याची शक्यता आहे. अमेरिकेच्या क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरनेही ला निनाविषयी अंदाज दिला आहे. क्लायमेट प्रेडिक्शन सेंटरच्या मते, ऑक्टोबर ते डिसेंबर दरम्यान ला निना निर्माण होण्याची ◀◀ पान २ वर

### डिसेंबरमध्ये भारतात पाऊस...

एपीसीसीने डिसेंबरमध्ये भारतात सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज दिला आहे. पूर्व हिंद महासागरात सरासरीपेक्षा कमी पावसाची शक्यता असतानाही हा अंदाज देण्यात आला आहे. तसेच जगातील बहुतेक भागात डिसेंबर २०२४ ते मे २०२५ या काळात तापमान सरासरीपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे.



cmyk

अग्रलेख

# आज फैसला: नवीन समिकरणे जन्माला येणार?

महाराष्ट्राच्या निकालाकडे संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेले आहे. बहुतांश संस्थांनी जे आपले प्राथमिक अंदाज किंवा एक्झिट पोल जाहीर केलेले आहेत, ते पाहता महाराष्ट्रामध्ये 'चौकानेवाले' निकाल येणार आहेत. आतापर्यंत दहा संस्थांनी जे अंदाज वर्तविले आहेत, त्यानुसार सहा संस्थांनी युतीचे सरकार पुन्हा सत्तेवर येईल, असा अंदाज वर्तवलेला आहे. तर चार संस्थांनी महाविकास आघाडी बहुमताने सत्तेवर येईल, असे म्हटले आहे. एका नामांकित राष्ट्रीय वृत्त संस्थेने मात्र प्रथमच एक्झिट पोलमध्ये आपला सहभाग दाखविलेला नाही, याचे कारण असे हे या संस्थेने नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये जो काही अंदाज वर्तविला होता, तो पूर्णत: चुकीचा ठरला होता. महाराष्ट्रात नेमके काय होणार आहे, याबाबत कोणत्याही वृत्तसंस्थेचे एकमत नाही. म्हणजेच खुद्द सत्ताधारी भाजपदेखील आपला पक्ष पूर्ण बहुमतानीशी सत्तेवर येईल, अशी शाश्वती देत नाही. याचा अर्थ प्रत्यक्ष निकालाचीच वाट पहावी लागणार आहे.

भाजपचे काही वरिष्ठ नेते मतदान झाल्यापासून अपक्षांच्या संपर्कात आहेत. अपक्षांशिवाय किंवा त्यांच्या मदतीशिवाय सरकार स्थापन होऊ शकत नाही, याचा अंदाज भाजपला आहे. महाराष्ट्रातील निवडणुकीमध्ये 'बटेंगे तो कटेंगे' या एका हाकेने हिंदुत्ववादी मतदारांमध्ये एकतर चैतन्य निर्माण झाले असावे किंवा या घोषणेचा राग म्हणून मोठ्या प्रमाणात अल्पसंख्याकांनी देखील मतदान करून मतदानाची टक्केवारी वाढविली असावी आणि सर्वात प्रथम म्हणजे 'लाडक्या बहिणी'ला ज्या युती सरकारने भाऊबीज दिलेली आहे, त्याचाही परिणाम म्हणून बहिणीने भावाला कदाचित मतामधून भेट दिली असावी. म्हणजेच महाराष्ट्रातील मतदानाची जी टक्केवारी वाढली, ते पाहता सत्ताधारी पक्षाला निश्चितच त्याचा लाभ झालेला असावा, असा अंदाज आहे. १९९५ मधील महाराष्ट्राच्या निवडणुकीचा विचार करता, त्यावेळी राज्यात काँग्रेस, राष्ट्रवादीचे सरकार सत्तेवर होते मात्र निवडणुकीमध्ये जे बंपर मतदान झाले ते ७१.६९ टक्के एवढे होते. आतापर्यंतचे महाराष्ट्रातील हे सर्वाधिक मतदान असे म्हणण्यास हरकत नाही व त्यावेळी या प्रचंड मतदानाचा लाभ शिवसेना - भाजप युतीला झाला आणि महायुतीचे सरकार महाराष्ट्रात सत्तेवर आले होते. आता २०१९ च्या निवडणुकीचा विचार करता ६१ टक्के मतदान झाले आणि सत्ताधारी भाजप शिवसेनेला सत्तेवर पोहोचता आले मात्र शिवसेनेने मुख्यमंत्री पदाचा आग्रह धरला आणि सारे गणित बिघडवून टाकले. तो राग भाजपला होता आणि त्यांनी शिवसेनेमध्ये फूट पाडून शिवसेनेची ताकद कमी केली. शिवसेनेला सत्तेवरून खाली खेचले आणि ज्या शिवसेनेला सत्तेवर येण्यासाठी मदत केली त्या शरद पवारांच्या राष्ट्रवादीमध्ये देखील फूट पाडून त्यांनादेखील सत्तेत सहभागी करून घेतले आणि त्या पक्षाला देखील खिळखिळी करण्याचा प्रयत्न भाजपने केला. गेले अडीच वर्षे सत्तेवर असलेल्या युतीने शेतमालाला पाहिजे तेवढा भाव न दिल्याने नाराज बळीराजा, त्याचबरोबर आमच्या पक्षांमध्ये फूट पाडली आणि भाजप कसा खलनायक आहे, असे सांगून वेळप्रसंगी डोळ्यात पाणी आणून राष्ट्रवादी आणि उद्धव ठाकरे यांनी मतदारांना जी भावनिक साद घातली, त्यांचा विचार करता मतदारांनी खरोखरच त्यांचे म्हणणे स्वीकारले का? हा प्रश्न समोर येतो आणि त्यामुळेच मतदानाच्या टक्केवारीत वाढ झाली का, असा एक प्रवाह महाराष्ट्रात निर्माण झालेला आहे.

ही निवडणूक अटीतटीची झालेली आहे. त्यामुळे छातीठोकपणे कोणीही एखादा पक्ष सत्तेवर येईल, हे सांगू शकत नाही. महाराष्ट्रात नेमके काय होईल, हे पाहायला शनिवारचा दिवस महत्वाचा असून, दुपारपर्यंत चित्र स्पष्ट होणार आहे.

महाराष्ट्रात गेल्या ३० वर्षांमध्ये एकही पक्ष पूर्ण बहुमतानिशी सत्तेवर आलेला नाही. युती व आघाडी करीतच महाराष्ट्रात सरकार चालते. एका पक्षाचे सरकार येण्याचे दिवस किमान महाराष्ट्रात तरी संपले की काय, असा प्रश्न उपस्थित होतो. महाराष्ट्रातील जनतेने महाराष्ट्राच्या ताटात नेमके काय वाढलेले आहे, हे कळण्यास मार्ग नाही. अंदाज हा शेवटी अंदाज असतो, एक्झिट पोलमधील चुकून एखादा निकाल हा बरोबर राहतो. लोकसभा निवडणुकीमध्ये अनेक भल्या मोठ्या संस्थांना फार दणका बसला. त्यामुळे या निवडणुकीत कोणीही फार मोठी जोखीम पत्करायला तयार नव्हता. तरीदेखील जे अंदाज वर्तविण्यात आले, ते सर्वांचीच करमणूक करणारे ठरले आहेत.

२८८ मतदारसंघांतील ९.९६ कोटी जनतेने जो काही कौल दिलेला आहे, तो महाराष्ट्राच्या राजकीय स्थिरतेला मजबूत करणारा असावा. या निवडणुकीत महाराष्ट्राने जो काही कौल दिलेला आहे, त्यातून नवी समिकरणे घडणार, हे मात्र निश्चित आहे.

# माजलगाव मठात २ डिसेंबर रोजी वीरशैव लिंगायत वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन

## श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांची माहिती


**माजलगाव । प्रतिनिधी**

**सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगावच्या वतीने येत्या सोमवार, दिनांक ०२ डिसेंबर २०२४ रोजी लिंगैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभु पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या तृतीय जयंतीनिमित्त सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी वीरशैव समाजातील सर्व लिंगायत व पोटजाती यांचा दुसरा वधू-वर परिचय मेळावा होणार आहे, अशी माहिती विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.**

### 'समाजहितासाठी वधू-वर परिचय मेळावा आवश्यक'

सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगावच्या वतीने यंदाही भव्य स्वरूपात वीरशैव लिंगायत समाजातील सर्व पोटजातीतील वधू-वर परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. काळाबरोबर सामाजिक बांधिलकीचा वसा घेत मठातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. आजमितीला समाजाच्या हितासाठी वधू-वर परिचय मेळावा आवश्यक आहे, अशी प्रतिक्रिया माध्यमांशी बोलताना मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी दिली.

'लोकहितं मम्? करणीयम्' या उक्तीप्रमाणे लिंगैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य महाराज माजलगाव यांचे तृतीय जयंती निमित्ताने श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या नेतृत्वाखाली वीरशैव समाजातील सर्व लिंगायत व पोटजाती यांचा दुसरा वधू-वर परिचय मेळावा संपन्न होत आहे. सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठाचे पूर्वाचार्य लिंगैक्य प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचा तृतीय जयंतीनिमित्त विविध धार्मिक विधी आणि सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार, दि. ०२ डिसेंबर २०२४ सकाळी १० पासून ते



सायंकाळी ०४ वाजेपर्यंत हा कार्यक्रम सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठ माजलगाव जि.बीड येथे होणार आहे. सकाळी ८ वाजता ते १० वाजता लिंगैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभू पंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांचे समाधिस रूद्राभिषेक, १० वाजता आरती व श्रीगुरूंचे आशिर्वचन व नंतर सकाळी ११ पासून वधू-वर परिचय मेळाव्यास सुरूवात. या कार्यक्रमाला समाज बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मठाधिपती श्री गुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे.

### वधू-वर परिचय मेळावा; नाव नोंदणीसाठी संपर्क साधावा

वीरशैव लिंगायत वधू-वर परिचय मेळाव्याची जय्यत तयारी सुरू आहे. समाज बांधवांनी वधू-वर परिचय मेळाव्यात सहभाग नोंदविण्यासाठी डॉ.गजाननआप्पा होन्ना (मो.९८९०४८६२८८), मनोहरअप्पा जामकर (मो.८२७५००३१५२), कैलासआप्पा खुर्पे (मो.९९२१८७३३२१), राजाभाऊआप्पा लोखंडे (मो.९०४९९४८१६१), सुचेंद्रअप्पा महाजन (मो.८२७५००३१५२), नितीनअप्पा शेटे (मो.९४२११६२६६७), संजयअप्पा मोगरेकर (मो.९८९०७१८८८८), विकासआप्पा पाटील (मो.९६३७१८४७०८), प्रशांतआप्पा शेटे (मो.९१७५०८९८९८), रामेश्वरआप्पा काटकर (मो.९८२२१४१४२८), कैलासआप्पा लांडगे (मो.९१७५०८९८९८), सुरेशआप्पा कुरूळे (मो.८८८८२६८१८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी संस्थान मठ माजलगावच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे आयोजन समस्त वीरशैव लिंगायत समाज बांधव, महिला मंडळ माजलगाव यांनी केले आहे.

# पोलिसांचा पक्षपातीपणा; खा.सोनवणेंकडून 'त्या' हल्लेखोरांच्या अटकेची मागणी

## पोलीस अधिक्षकांना केले अवाहन

**बीड । प्रतिनिधी**

**परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी** न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ॲड.माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जीवघेणा हल्ला करण्यात आला. पोलीसांसमोर हल्ला होऊनही गुन्हा दाखल केला नसून पोलिसांकडून पक्षपातीपणा सुरू आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल करून हल्लेखोरोंना अटक करावी, असे अवाहन खा.बजरंग सोनवणे यांनी पोलिस अधिक्षकांना केले आहे.



प्रसिध्दी पत्रकात म्हटले आहे, परळीत बोगस मतदान रोखण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल करणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते ॲड.माधव जाधव यांच्यावर २० नोव्हेंबर रोजी परळी येथे जीवघेणा हल्ला करण्यात आला. याच परिसरात उमेदवार राजेसाहेब देशमुख यांच्या सुरक्षा रक्षकांनाही हल्लेखोरांकडून दमदाटी करण्यात आली. हा प्रकार पोलीस यंत्रणेसमोर घडूनही अद्यापपर्यंत हल्लेखोरांवर कोणताही गुन्हा दाखल करण्यात आलेला नाही. उलट, आकसापोटी उमेदवारांच्या नातेवाईकांवर गुन्हे दाखल केले जात आहेत. हा पक्षपातीपणा खपवून घेतला जाणार नाही. बीड पोलीस अधीक्षक यांना माझे आवाहन आहे, ॲड.माधव जाधव यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करावी. अन्यथा, लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, व त्याच्या परिणामांची संपूर्ण जबाबदारी पोलीस अधीक्षकांवर असेल, असेही खा.बजरंग सोनवणे यांनी म्हटले आहे. शिवाय परळीत मतदान सुरू असताना अनेक ठिकाणी मतदारांनाही दमदाटी करण्याचे प्रकार घडले असून पोलीसांच्या अंगावरही विरोधकांचे कार्यकर्ते धावून गेलेले आहेत. असे असताना पोलीसही शांत आहेत. येणाऱ्या काळात हे असेच वाढत जाऊन लोकशाही धोक्यात येण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी बघ्याची भुमीका न घेता दोषींवर निपक्षपातीपणे कारवाई करावी, असेही म्हटले आहे.

# अमरधाम स्मशानभूमीतील दुरुस्तीची कामे प्रगतीपथावर

**बीड । प्रतिनिधी**

**माजी नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी मोंढा भागातील कामे सुरू केली असून जालना रोड ते मोंढा या रस्त्याचे काम जवळपास पूर्ण होत आले आहे. याशिवाय त्यांनी विप्र नगर ते मोंढा जोडणारा पूल याचे काम सुरू केले आहे. सर्वात महत्त्वाचा विषय मोंढा भागातील स्मशानभूमीतील दुरुस्तीची कामे हाती घेतली असून ही सर्व कामे आता प्रगती पथावरअसल्याचे अमर नाईकवाडे यांनी सांगितले.**





बीड शहरातील मोंढा भागात असलेल्या अमरधाम स्मशानभूमी मध्ये अनेक असुविधा सुरू झाल्या होत्या. नळाची दुरुस्ती, पेव्हरब्लॉक टाकणे, फुटलेल्या फरशा बसवणे, काँक्रीट करणे, पंखे बसवणे, लाईटची व्यवस्था पाहणे आदी सर्व कामे अमर नाईकवाडे यांनी सुरू केली असून ही कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिकांची मोठ्या प्रमाणात सोय होणार आहे. याशिवाय त्यांनी जालना रोड ते मोंढा भागात जाणारा मुख्य रस्त्याची एक बाजू पूर्ण केली असून आता दुसरी बाजू जवळपास पूर्ण होत आहे. विप्र नगर मधील नागरिकांसाठी मोंढ्याला जोडणारा पूल याची रुंदी वाढवण्यासाठी त्यांनी काम हाती घेतले असून ही रुंदी ही वाढून हा पुल लवकरच पूर्ण होईल असा विश्वास अमर नाईकवाडे यांनी व्यक्त केला.

# काँग्रेस महाविकास आघाडी स्पष्ट बहुमतासह सत्ता स्थापन करेल

## रमेश चेन्नीथला याचा विश्वास



**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील जनतेचा कौल महाविकास आघाडीलाच मिळेल व स्पष्ट बहुमतासह काँग्रेस महाविकास आघाडी सरकार स्थापन करेल असा विश्वास काँग्रेसचे महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला यांनी व्यक्त केला आहे.

टिळक भवनमध्ये प्रसार माध्यमांशी बोलताना रमेश चेन्नीथला पुढे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीप्रमाणे विधानसभा निवडणुकीतही महाराष्ट्रातील जनता काँग्रेस व महाविकास आघाडीच्या पाठीशी भक्कमपणे उभी राहिली आहे. विधानसभेला जास्त मतदान झाल्याचा फायदाही काँग्रेस महाविकास आघाडीलाच होईल. मविआला स्पष्ट बहुमत मिळत असल्याचे दिसत आहे त्यामुळे त्रिशंकु विधानसभेचा प्रश्न उद्भवत नाही. निवडून आलेल्या आमदारांना काँग्रेस पक्षाने हॉटेलमध्ये राहण्याची व्यवस्था केली आहे का, यावर बोलताना चेन्नीथला म्हणाले की, काँग्रेसचे आमदार कठीण परिस्थितीतही पक्षासोबत राहिले आहेत त्यामुळे त्यांना हॉटेलमध्ये ठेवण्याची आवश्यकता वाटत नसल्याचे मतही यावेळी व्यक्त केले. मुख्यमंत्रीपदाच्या प्रश्नावर रमेश चेन्नीथला म्हणाले की, मुख्यमंत्रीपदावरून कोणताही वाद नाही, निकालानंतर महाविकास आघाडीतील प्रमुख नेते एकत्र बसून त्यावर निर्णय घेतील.

# पान १ वरून...

### जीएम तेलबिया पिकांना

वापर वाढणार आहे. घरगुती, स्नॅक्स पदार्थ आणि रेडी टू ईट या क्षेत्रातही खाद्यतेल वापर वाढेल. म्हणजेच देशातील खाद्यतेलाचे उत्पादन आणि वापर यात मोठी तफावत येण्याची शक्यता आहे. ही तफावत किंवा टंचाई दूर करण्यासाठी सरकारने राष्ट्रीय तेलबिया मिशन आणि पाम तेल मिशनची सुरुवात केली आहे. ही चांगली गोष्ट आहे, असेही अस्थाना यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे. दरम्यान, २०२३-२४ च्या हंगामात देशातून २२ लाख टन मोहरीपेंड निर्यात झाली होती. पण एप्रिल-ऑक्टोबर २०२४ मध्ये मोहरीपेंड निर्यात २५ टक्क्यांनी कमी झाली. कारण आंतरराष्ट्रीय बाजारात किमती कमी झाल्या. त्यामुळे सरकारने मोहरी पेंड निर्यातीला १५ टक्के सवलत द्यावी, अशी मागणीही अस्थाना यांनी केली आहे.

--------

### कोण हिरो..कोण झिरो...

लक्ष्मण हाके यांनी ओबीसी त्यांच्या बाजूने झुकल्याचे दिसले. त्यामुळे गेवराई मतदार संघात सुद्धा कोण विजय होईल याबाबत चुरस आहे. बीड विधानसभा मतदारसंघांमध्ये दोन ओबीसी तर तीन मराठा उमेदवार असताना चांगलीच चुरस पाहायला मिळाली. संदीप क्षीरसागर यांना शेवटच्या दोन दिवसांमध्ये मराठा समाजाचे बळ मिळाल्यामुळे बीड विधानसभेमध्ये रंजकता आली आहे. योगेश क्षीरसागर यांचा एकतर्फी वाटत असलेला विजय आता पुसटसा दिसू लागला आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघांमध्ये माजी मंत्री व भाजपचे उमेदवार सुरेश धस आणि अपक्ष उमेदवार भीमराव धोंडे यांच्यामध्ये खरी लढत झाली. या दोघांपैकी एकच आष्टीचा आमदार होण्याची दाट शक्यता आहे. विधानसभा मतदारसंघांमध्ये पृथ्वीराज साठे यांचे पारडं जड असून तेच आमदार होतील असा अंदाज आहे. त्यामुळे दिनांक २३ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या मतमोजणीत कोण हिरो आणि कोण झिरो याचा फैसला होणार असून कोण कोणाला पाडण्यासाठी कारणीभूत ठरतो. तर कोण कोणाला विजयी करण्यामध्ये हातभार लावतो मतमोजणी नंतर स्पष्ट होणार आहे.

---------

### तावडे यांच्याकडून गांधी, खर्गे, श्रीनेत

फौजदारी गुन्हा दाखल करतील आणि १०० कोटी रुपयांची दिवाणी खटलाही दाखल करतील. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पूर्वसंध्येला विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटत असल्याचा आरोप करण्यात आला होता. त्यावेळी मुंबईत नाट्यमय प्रकार घडला होता. त्यावर काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस नेते राहुल गांधी आणि पक्षाच्या प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी थेट प्रतिक्रिया देत तावडे यांच्यावर पैसे वाटल्याचे आरोप केले होते. त्यानंतर तावडे म्हणाले की, काँग्रेसला फक्त माझी आणि माझ्या पक्षाची बदनामी करायची होती. मी एका सामान्य मध्यमवर्गीय कुटुंबातून आलो आहे, मी गेली ४० वर्षे राजकारणात आहे. पण मी असे काहीही केले नाही. काँग्रेसच्या नेत्यांना माझी, पक्षाची आणि माझ्या नेत्यांची बदनामी करायची होती, त्यामुळे त्यांनी हे खोटे दावे माध्यमांसमोर आणि जनतेसमोर मांडले, म्हणून मी त्यांना न्यायालयाची नोटीस बजावून जाहीर माफी मागावी अन्यथा कारवाईला सामोरे जावे, असे सांगितले आहे.

----------

### महायुती-महाविकास आघाडीकडून

कोणत्या पक्षाच्या उमेदवाराला कल मिळत आहे याचा प्रत्येक पक्षाच्या कोअर टीमला चांगलाच अंदाज आलेला आहे. त्यामुळे महाविकास आघाडीतील पक्ष आणि महायुतीतील राजकिय पक्षांकडून सावध भूमिका व्यक्त करण्यात येत आहे. मात्र या दोन्ही महायुती आणि महाविकास आघाड्यांकडून अपक्ष आमदार आणि बंडखोर आमदारांना पुन्हा एकदा चुचकारण्याचे प्रयत्न सुरु केले आहेत. ज्या उमेदवारांनी ज्या पक्षाच्या उमेदवारांच्या विरोधात बंडखोरी केली. त्या बंडखोरांनी पुन्हा एकदा स्वपक्षाच्या नेत्यांच्या हाकेला ओ दिला आहे. त्यात महाविकास आघाडीचे उमेदवार आणि महायुतीच्या उमेदवारांचाही समावेश आहे. काँग्रेस, शिवसेना उबाठा आणि राष्ट्रवादी काँग्रेसकडून पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात निवडणूक लढविलेल्या बंडखोरांशी संपर्क करण्यात येत असून विजयी झाल्याचे प्रमाणपत्र घेऊनच मुंबई गाठा असे आदेश पक्षाच्या संभावित आमदारांसह बंडखोरांनाही निरोप दिले जात आहेत. तर भाजपा, शिंदेंच्या शिवसेनेत आणि अजित पवारांच्या राष्ट्रवादीत तशी तुलनेते कमी बंडोखोरी झाली आहे. त्यामुळे जे पक्षाचे सदस्य नसलेले मात्र अपक्ष आमदार म्हणून निवडणूकीला सामोरे गेलेल्या आमदारांना तसेच लहान राजकिय पक्षाच्या नावाखाली निवडणूक लढविलेल्या आमदारांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न भाजपा आणि महायुतीच्या नेत्यांकडून सुरु करण्यात आला आहे. अशा आमदारांना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे शासकिय निवासस्थान असलेल्या सागर बंगल्यावर चर्चेसाठी बोलाविण्यात येत आहे. तर काहींना फोनवरूनच कळविले जात आहे.

**पंचताराकित हॉटेल बूक केल्याची चर्चा**

या सर्व अपक्ष आणि बंडखोर आमदारांना विजयाची घौडदोड पूर्ण होताच तडक मुंबई गाठण्यास सांगण्यात येत असून त्यासाठी मुंबईतील काही पंचतारांकीत हॉटेल्सही बुक करण्यात आल्याची चर्चा मुंबईच्या राजकिय वर्तुळात सुरु झाली आहे.

-----------

### ब्रेकअप किंवा लग्नाचे वचन मोडले तर पुरुषावर

पुरुष आणि महिलेचे सहमतीने प्रेमसंबंध असतील आणि ब्रेकअप झाले तर त्याच्यावर अत्याचाराचा गुन्हा दाखल करता येणार नाही असा महत्वाचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. सुप्रीम कोर्टाने एका प्रकरणावर सुनावणी करत असताना हा निर्णय दिला आहे. पुरुष आणि महिलेमध्ये सहमतीने प्रेमसंबंध असतील आणि लग्नाचे दिलेले वचन त्याने मोडले किंवा पूर्ण केले नाही तर तो अत्याचराचा गुन्हा ठरत नाही असे सुप्रीम कोर्टाने म्हटले आहे. एका महिलेने आपल्या प्रियकराबद्दल तक्रार दाखल केली होती. प्रियकराने लग्नाचे वचन देऊन वारंवार अत्याचार केल्याची तक्रार महिलेने केली होती. मात्र या प्रकरणात सुनावणी करत असताना सुप्रीम कोर्टाने तरुणाला दिलासा दिला आहे. परस्पर सहमतीने रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या जोडप्यांमध्ये ब्रेकअप झाले तर एखाद्या पुरुषाविरुद्ध फौजदारी खटला चालवला जाऊ शकत नाही असा महत्वाचा निर्णय सुप्रीम कोर्टाने दिला आहे. या प्रकरणात तरुणाला कोर्टाने दिलासा दिला आहे. ब्रेकअप केले किंवा लग्नाचे वचन मोडले तर त्याच्यावर अत्याचाराचा खटला दाखल होऊ शकत नाही असे कोर्टाने म्हटले आहे.

-------------

### संख्याबळ मिळाल्यास सत्तेत

चर्चेचे प्रस्ताव येण्याआधीच वंचित एकला चलो रे ची भूमिका घेत जवळपास २८८ जागांवर सर्वात आधी उमेदवार जाहिर करत त्यांच्या प्रचारालाही प्रकाश आंबेडकर यांनी सुरुवात केली होती. या सगळ्या पार्श्वभूमीवर वंचितचे ५० ते ६० उमेदवार विजयी होतील असा दावा प्रकाश आंबेडकर यांनी केला. तसेच सत्ता स्थापन करू शकणाऱ्यांसोबत राहु असे वक्तव्य करत निवडणूकीनंतर महाविकास आघाडी आणि महायुतीला पाठिंबा देण्याची तयारी दर्शविली आहे. यासदंर्भात प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर ट्विट करत तयारी दर्शविली आहे.

------------

**ला निना पुढच्या**

शक्यता ५७ टक्के आहे. तर जानेवारी ते मार्च २०२५ च्या दरम्यान ही स्थिती कायम राहू शकते.

-------------

### एकाधिकारशाहीला कंटाळून शिंदे,

सत्ता पुन्हा आपल्याच ताब्यात राहावी किंवा राहील अशी अपेक्षा आहे. त्या दृष्टीने महायुतीच्या नेत्यांनी संपूर्ण राज्यामध्ये जोरदार फील्डिंग सुद्धा लावली होती.. जरांगे फॅक्टर मुळे लोकसभेला जो फटका बसला होता त्याचा प्रभाव कमी करण्यासाठी लाडकी बहिणीसह वेगवेगळे योजना राज्यांमध्ये राबवल्या गेल्या. त्याचा परिणाम सुद्धा विधानसभा निवडणुकीच्या निकालांमधून दिसून येऊ शकतो. तत्पूर्वी गेल्या अडीच ते तीन वर्षांमध्ये एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री म्हणून अजित पवार यांना काम करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. काम करताना मुभा दिली जात नाही असं वारंवार म्हटलं गेलं. त्यामुळे कुठेतरी जनतेच्या जिवाळ्याचे प्रश्न सोडवण्यामध्ये शिंदे आणि पवार यांना अपयश आल्याचं म्हटलं जात होतं. पुढे भविष्यात सुद्धा याच अडचणीचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे विधानसभा निवडणुकीत जनतेने पवारांच्या बाजूने कौल दिला तर जनतेचा भ्रमनिरास होऊ शकतो, म्हणूनच मोदी- शहा आणि देवेंद्र फडणवीस यांच्या एकाधिकारशाईला कंटाळून एकनाथ शिंदे आणि अजित पवार भाजपची साथ सोडू शकतात अशी आता जोरदार चर्चा सुरू झाली आहे. तसे झाले तर मुख्यमंत्री म्हणून शपथ घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्या देवेंद्र फडणवीस यांचा हिरमोड होऊ शकतो. शिवाय राज्यातील सत्ता सुद्धा गमवावी लागण्याची दाट शक्यता आहे. पवार आणि शिंदे निकालानंतर नेमका काय निर्णय घेतात याकडे आता खऱ्या अर्थाने संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
शनिवार दि. २३ नोव्हेंबर २०२४
३

## सेवानिवृत्त परिचारिका जयश्री माताडे यांचे निधन



**बीड । प्रतिनिधी**

दीर्घकाळ रुग्णांची अतिशय तळमळीने सेवा करणाऱ्या बीड जिल्हा रुग्णालय येथील सेवानिवृत्त सिस्टर इन्चार्ज जयश्री अनिल माताडे यांचे आज दुपारी १ वाजता अल्पशा आजाराने ६८ व्या वर्षी दुःखद निधन झाले. त्या अतिशय मनमिळाऊ व रुग्ण सेवेत अतिशय तन्मयतेने सेवा करणाऱ्या सुस्वभावी म्हणून प्रसिद्ध होत्या. त्यांच्या सेवेबद्दल १९९४ साली त्यांना तत्कालीन उपमुख्यमंत्री गोपीनाथजी मुंडे यांच्या हस्ते बेस्ट नर्स चा पुरस्कार ही मिळाला होता. बीड शहरातील प्रसिद्ध व्यक्तिमत्व अनिल माताडे यांच्या त्या पत्नी होत्या. त्यांनी आपल्या चारी मुलांना चांगले शिक्षण देऊन मुलांना डॉक्टर, शिक्षक व मुलींना नर्स बनविले. आज त्यांच्या पाठीमागे पती, दोन मुले, दोन मुली, सुना, जावई व नातवंडे असा मोठा परिवार आहे. उद्या सकाळी ठीक ८:३० वा. पोलीस मुख्यालय शेजारी पीस ऑफ इडेन गार्डन येथिल ख्रिश्चन कबरस्थानात त्यांचा अंत्य विधी पार पडेल. त्यांच्या निधनाच्या बातमीने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

# त्या १२२ मतदान केंद्रावर फेर मतदान घेऊन आजही लोकशाही जिवंत असल्याचे निवडणूक आयोगाने दाखवून द्यावे - राजेसाहेब देशमुख

## जिल्हा पोलीस प्रशासन आपल्या कर्तव्यात पक्षपातीपणा करत आहे-ॲड. माधव जाधव

अंबाजोगाई । प्रतिनिधी

परळी विधानसभा मतदारसंघातील परळी शहर व तालुक्यातील त्या १२२ मतदान केंद्रावर निवडणूक आयोगाने पुनः फेर मतदान घेऊन देशात तथा राज्यात आजही लोकशाही जिवंत असल्याचे दाखवून द्यावे अशी मागणी परळी विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अधिकृत उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी पत्रकार परिषदेद्वारे केली आहे. त्याचबरोबर परळी मतदार संघातच काल झालेल्या ॲड माधव जाधव यांच्यावर गावगुंडांनी केलेल्या भ्याड हल्ल्याबाबत जिल्हा पोलीस प्रशासन हे पक्षपाती पणा करत असल्याचा गंभीर आरोप याच पत्रकार परिषदेत केला आहे.

गुरुवार दि २१ रोजी आयोजित पत्रकार परिषदेत परळी विधान सभेचे



उमेदवार राजेसाहेब देशमुख, ॲड माधव जाधव तसेच सुदामती गुट्टे या उपस्थित होत्या.

आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत राजेसाहेब देशमुख , ॲड माधव जाधव तसेच सुदामती गुट्टे यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्यावर गुंडगिरी, ठोकशाहीच्या बळावर परळी मतदार संघात दहशत निर्माण केली असल्याचा आरोप केला. परळी शहर तसेच तालुक्यातील अनेक ठिकाणी बूथ ताब्यात घेऊन तिथे बोगस मतदान केल्याची तक्रार निवडणूक आयोगाकडे देखील केली असल्याचे सांगितले. अनेक ठिकाणच्या बुथवर एकच माणूस बसवून मतदान यंत्रावरील विशिष्ट असे बटन दाबण्यात येत होते. आलेल्या मतदारांच्या बोटावर बाहेरच शाई लावून त्याला परत पाठवण्यात येत असल्याने मतदानास आलेल्या मतदारांचा भ्रमनिरास होतांना दिसत होता. याबाबत अनेक मतदारांनी आमच्याकडे तक्रारी केल्या असून याबाबत पोलीस प्रशासनास कळवले असतांना पोलीस प्रशासन देखील बघ्याची भूमिका घेत असल्याचे राजेसाहेब देशमुख यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.अशा या घडत असलेल्या निंदनिय घटना पाहून खरच आपण महाराष्ट्रातच आहोत की अन्य राज्यात असा प्रश्न निर्माण होत होता . निवडणुकीपूर्वीच या सर्व बाबींची लेखी सूचना निवडणूक आयोगाकडे करून देखील आयोगाने तसेच प्रशासनाने याकडे गांभीर्याने न पाहता याकडे डोळेझाक केल्याचे राजेसाहेब देशमुख तसेच ॲड माधव जाधव यांनी यावेळी सांगितले. ज्यावेळी माधव जाधव यांना मारहाण करण्यात येत होती त्यावेळी पोलीस त्याठिकाणी असतांना देखील त्यांनी कसलीही हालचाल केली नाही किंवा तक्रार देखील नोंदवली नाही यावरून पोलीस प्रश्नावर देखील त्यांनी याबाबत अंगुलीनिर्देश केला. त्यामुळेच नाईलाजाने आपणास स्पीड पोस्टाद्वारे राज्याचे राज्यपाल, मुख्यमंत्री , जिल्हाधिकारी तसेच मुख्य निवडणूक आयोगाकडे लेखी तक्रार केल्याचे यावेळी ॲड माधव जाधव यांनी सांगितले. परळी शहर तसेच तालुक्यातील अतिसंवेदनशील असे ते मतदानकेंद्र व ज्या ज्या ठिकाणी गैरप्रकार करून मतदान केले या अशा १२२ मतदान केंद्रावर फेर मतदान घ्यावे अशी मागणी परळी विधानसभा मतदार संघाचे महा विकास आघाडीचे उमेदवार राजेसाहेब देशमुख यांनी या जाहीर पत्रकार परिषदेद्वारे केली आहे.

## आम्हाला मंत्रिमंडळात भागिदारी पाहिजे', निकालापूर्वीच महादेव जानकर यांनी ठेवल्या अटी

**मुंबई । प्रतिनिधी**

महाराष्ट्राच्या राजकारणासाठी उद्या महत्त्वाचा दिवस आहे. कारण विधानसभा निवडणुकीचा निकाल उद्या जाहीर होणार आहे. पण निकालाआधीच



राज्यात संख्याबळाची जमवाजमव सुरु असल्याचं बघायला मिळत आहे. विशेष म्हणजे मतदानानंतर जाहीर झालेल्या एक्झिट पोलच्या आकडेवारीनुसार, राज्यात छोटे पक्ष आणि अपक्षांची बार्गेनिंग पावर वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळे छोट्या पक्षांकडूनही वेगवेगळ्या प्रतिक्रिया देण्यात येत आहेत. विशेष म्हणजे राष्ट्रीय समाज पक्षाचे नेते महादेव जानकर यांनी महाविकास आघाडी आणि महायुतीसाठी मैत्री करण्यासाठी अटीच ठेवल्या आहेत. महादेव जानकर यांनी 'टीव्ही ९ मराठी'ला प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी याबाबत सविस्तर भाष्य केलं.

महाराष्ट्रातील तमाम मतदार बंधू-भगिनींचा मी आपल्या माध्यमातून आभार मानतो आणि अभिनंदन करतो. लोकशाहीचा उत्सवामध्ये मतदारांचा टक्का वाढल्यामुळे अभिनंदन करतो. हा जो टक्का वाढलेला आहे तो परिवर्तनाची शक्यता असू शकते'', असं मोठं वक्तव्य महादेव जानकर यांनी केलं.

'रासपला चांगलं यश मिळेल'

''आज माझं एवढंच म्हणणं आहे की, आम्ही खातं खोलतोय. पाठीमागच्या विधानसभेत माझा एक आमदार होता आणि वरच्या सभागृहात एक असे दोन आमदार होते. पण आता आमचे दोनाचे चार, चाराचे सहा वाढतील. जनतेचा कौल शेवटी, त्यांच्या हातात आहे. राष्ट्रीय समाज पक्षाला चांगलं यश मिळेल, असा मला भरोसा आहे'', असं महादेव जानकर म्हणाले.

# मुलांना लागला मोबाईलचा लळा

## गुणवत्तेवर परिणाम होत असल्यामुळे पालक चिंतेत

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

पुर्वी विद्यार्थी शिक्षक व पालकाच्या अनुभवाने अभ्यासात हुशार होता. आज त्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता एकदम कमी दिसुन येत आहे. याचे कारण शोधले तर गेल्या दोन पालकांनी स्वतःला महागडे मोबाईल आणले. परंतु मुले ते मोबाईल घेऊन वेगवेगळे खेळण्याचे गेम, युट्युब पाहणे, तासनतास मोबाईल पाहणे ह्या गोष्टी सुरू झाल्या आणि पालकांचे दुर्लक्ष झाले घेतला तरी पालक काही म्हणत नव्हते घरी आल्यावर पहिल्यांदा मोबाईल पाहतात जमल तरथोडा अभ्यास करतात आणि तासनतास मोबाईल घेऊन पाहतात.



पालक संतापतात याचा परिणाम म्हणजे मोबाईल नाही दिला तर जेवण न करणे, रुसुन बसने, उलटे बोलणे. एवढ्?यावर नाही मुले घरातच राहु लागली. मोबाईल मिळाला नाही तर तर काही मुले घर सोडुन जाण्याच्या धमक्याही देतात. मग आई वडीलांनी करायचे काय हा मोठा प्रश्न आहे शिक्षणाचे तर विचारणेच नको एवढे महागडे झाले आहे - की गोरगरीबांना शिक्षण घेण फार अवघड झाले आहे.परंतु मोबाईलच्या अति वापरामुळे आताची पिढी ही शिक्षणात पुढे राहणे, निरोगी राहणे महत्वाचे होते. पण ती शिक्षणातून बाहेर पडताना दिसत आहे. हे सर्व विद्यार्थ्याला कळाले पाहीजे मोबाईल काय कधिही घेता येईल असे सर्व पालक समजून सांगतात पणआजच्या युगात मोबाईलचा लळा असलेले अशिक्षित विद्यार्थी शाळेत असतात पण घरी आले की त्यांच जगण म्हणजे मोबाईल आहे, असें म्हटले तर वावगे ठरणार नाही.

# तेजज्ञान फाऊंडेशनच्या रजत जयंती ध्यान महोत्सवाचे रविवारी आयोजन

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

तेजज्ञान फाऊंडेशनच्या रजत जयंती ध्यान महोत्सवचे आयोजन शहरातील लोकनेते गोपिनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे रविवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी संध्याकाळी साडेचार ते सात या वेळेत करण्यात आले आहे. तरी या कार्यक्रमास उपस्थित रहावे असे आवाहन तेजज्ञान फाऊंडेशन, शाखा अंबाजोगाईच्या वतीने करण्यात आले आहे.

हॅपी थॉट्स नांवाने ओळखली जाणारी तेजज्ञान ग्लोबल फाऊंडेशन ही आध्यात्मिक सेवाभावी संस्था आपल्या स्थापना दिनाच्या रौप्य महोत्सवी वर्षात प्रवेश करीत आहे. या विशेष प्रसंगी, फाऊंडेशन तर्फे रविवार, दिनांक २४ नोव्हेंबर २०२४ रोजी संध्याकाळी साडेचार ते सात या वेळेत शहरातील लोकनेते गोपिनाथराव मुंडे सभागृह, खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई येथे रजत जयंती ध्यान महोत्सव (सिल्व्हर ज्युबिली सेलिब्रेशन) आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून सुप्रसिद्ध डॉ.शंकर धपाटे (अधिष्ठाता, स्वामी रामानंद तीर्थ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा रूग्णालय), प्रसाददादा चिक्षे (समन्वयक, ज्ञान प्रबोधिनी, पुणे, शाखा अंबाजोगाई) व अविनाश भारती (प्रसिद्ध व्याख्याते, युवा कवी तथा किर्तनकार) या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तेजज्ञान फाऊंडेशनचे संस्थापक तेजगुरू सरश्री यांनी जीवनात ध्यान व आध्यात्मिक साधनेचे महत्त्व पटवून देत लाखो लोकांच्या जीवनात आनंद आणि शांती निर्माण केली आहे. तेजज्ञान फाउंडेशन तर्फे आयोजित हा महोत्सव ध्यानाच्या माध्यमातून जगभर शांतता आणि आनंद पसरविण्याच्या उद्दिष्टाला एक नवीन दिशा देईल. या महोत्सवात सहभागी होण्यासाठी फाऊंडेशन सर्व साधक, ध्यानप्रेमी आणि नागरिकांना उत्साहपूर्वक आमंत्रित करीत आहे. आपल्या जीवनात ध्यानाचा ठाव घेण्यासाठी आणि आनंद व शांततेच्या दिशेने एक पाऊल टाकण्यासाठी या महोत्सवाचा एक भाग व्हा, अधिक माहितीसाठी ७५८८५६६६८८ / ८२०८०४२७१६ / ९४२३३३११६६ या मोबाईल क्रमांकांवर संपर्क साधावा असे आवाहन तेजज्ञान फाऊंडेशन, शाखा अंबाजोगाईच्या वतीने करण्यात आले आहे.

# निकालापूर्वी भाजप आमदाराची राजकीय संन्यासाची घोषणा, भाजपमधील असंतोषामुळे राजकीय स्फोट

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक निकालापूर्वी भाजपमध्ये मोठी घडामोड घडली आहे. भाजपच्या विद्यमान आमदाराने राजकीय संन्यास घेण्याची घोषणा केली आहे. पक्षातील नेत्यांकडून झालेल्या आरोपामुळे व्यथित होऊन संन्यास घेण्याची घोषणा भाजपचे आमदार दादाराव केचे यांनी पत्रकार परिषदेत केली. ते वर्धा जिल्ह्यातील आर्वी मतदारसंघातील विद्यमान आमदार आहे.

काय म्हणाले दादाराव केचे

माध्यमांसमोर आपल्या मनातील भावना मांडताना दादाराव केचे म्हणाले, मी आता राजकीय संन्यास घेण्याचा निर्णय घेतला आहे. मी भाजपचे काम करणार नाही आणि



कोणत्याही पक्षात जाणार नाही. आता मी समाज कार्य करणार आहे. १९८३ पासून मी भाजपचे कार्य केले. त्यावेळी पक्षाला गावागावात नेले. संघटना मजबूत केली. त्यामुळे २००९ मध्ये आमदार झालो. त्यानंतर २०१४ मध्ये पराभव झाला. परंतु पुन्हा २०१९ मध्ये निवडून आलो.

का घेणार राजकीय संन्यास

दादाराव केचे म्हणाले, आपल्यावर कारण नसताना वेगवेगळे चुकीचे आरोप केले गेले. यंदाही पक्षाने मला तिकीट दिले होते. परंतु वेळेवर मागे घेण्यास सांगितले. पक्षाचा आदेश मान्य करत मी ती मागे घेतली. चार तारखेला पक्षाच्या नेतृत्वाच्या माध्यमातून मी फॉर्म मागे घेतला. त्यानंतर मी नाराज नव्हतो. भाजप उमेदवारासाठी २७ सभा घेतल्या. अनेक मेळावे घेतले. परंतु आता चुकीचे आरोप झाले. मतदार संघात मी काम केले नाही, असे आरोप केले जात आहे. मी कामे केली नसती तर निवडून येऊ शकलो नसतो. तसेच काम केले नसती तर मेळावे कशाला घेतले असते. आजही गावागावात माझे कार्यकर्ता आहेत. आपल्यावर होणारे आरोप पाहून वाटते, अर्ज मागे नसता घेतला, उभाच राहलो असतो तर बरे झाले असते.

पान ६ वरून...

### पैसे वाटपप्रकरणावरुन

असं विनोद तावडे यांनी म्हटलं होतं. तर, विनोद तावडे ५ कोटी रुपये घेऊन येतायत हे भाजपवाल्यांनीच मला सांगितलं. मला वाटलं विनोद तावडे राजकीय नेते आहेत, हे असं छोटं काम करणार नाही. मात्र आमचे कार्यकर्ते या ठिकाणी आले तेव्हा ते हॉटेलमध्ये पैसे वाटत होते, असा गौप्यस्फोट हितेंद्र ठाकूर यांनी केला. विशेष म्हणजे यावेळी हॉटेलमधील सीसीटीव्ही बंद होता. आम्ही आल्यानंतर सीसीटीव्ही चालू केला. हॉटेल मालकांनी असं का केलं, हे त्यांनाच विचारा...सीसीटीव्ही बंद केला, त्यामुळे हॉटेल मालकावर देखील गुन्हा दाखल केला पाहिजे, अशी देखील मागणी हितेंद्र ठाकूर यांनी होती.

विरार हॉटेलमधील घटनेनंतर काँग्रेस नेत्यांनी ट्विटरवरुन व सोशल मीडियाच्या माध्यमातून भाजपवर सडकून टीका केली होती. त्यामुळे, विनोद तावडे यांनी काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे. बिनशर्त माफी मागा, नाहीतर १०० कोटींचा दावा ठोकू, असा इशाराच तावडे यांनी विरार प्रकरणावरुन दिला आहे. त्यामध्ये, लोकसभा विरोधीपक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, आणि काँग्रेस नेत्या सुप्रिया श्रीनेट यांना नोटीस बजावण्यात आली आहे. पुढील २४ तासांत बिनशर्त माफीचा पर्याय विनोद तावडेंकडून देण्यात आला आहे. अन्यथा, १०० कोटींची मानहानीचा दावा ठोकणार असल्याचं तावडे यांनी म्हटलंय. तावडे यांनी आपल्या नोटीसमध्ये त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवरुन केलेल्या पोस्टचा उल्लेख करत आपली नाहक बदनामी झाल्याचं म्हटलं आहे. तसेच, मी ५ कोटी रुपये वाटल्याचे आरोप बिनबुडाचे असल्याचंही स्पष्टीकरण त्यांनी दिलंय.

### शेतकऱ्यांनी सीसीआय

रजिस्ट्रेशन करुन घ्यावे .. रजिस्ट्रेशन हे सुट्टीचे दिवशी म्हणजे, शनिवार, रविवार किंवा सार्वजनिक सुट्टीच्या दिवशी देखील सी सी आय कापूस केंद्रावर (सिध्दी जी प्रे. हनुमान नगर) या ठिकाणी सी सी आय चे कर्मचारी यांच्याकडे केले जाते. रजिस्ट्रेशन करताना ज्याच्या नाव सातबारा असेल तो शेतकरी अथवा त्याच्या रक्तातील नातेवाईक हजर असणे अत्यंत अनिवार्य आहे...

२) कापूस पहिल्या वेचणीचा ओला (थप्पीचा माल) असेल तर एक दिवस आगोदर मोकळा करुन दुसऱ्या दिवशी वाहनात भरावा जेणे करुन त्यातील ओलावा निघुन जाईल व चांगला भाव मिळेल, तसेच कापूस भरताना नकट्या, कवड्या, कचरा येणार नाही, स्वच्छ माल असेल याची काळजी घ्यावी. खराब माल असेल तर तो सीसीआय कडून परत पाठवला जाऊ शकतो..

३) शेतकऱ्याने वाहनात माल भरताना गोणी, बोन्द्री पोते, भोत, गाठोडे इ. मध्ये कापूस घेवून न येता वाहनात मोकळा कापूस भरुन घेऊन यावा. ४) कापूस खरेदी ही शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टी सोडता सोमवार ते शुक्रवार या दिवशी सका १०.०० ते दुपारी ४.०० पर्यंत च चालू राहील. याची कापूस शेतकऱ्यांनी नोंद घ्यावी

# सत्ता स्थापनेसाठी 'या' लोकांची गरजच पडणार नाही; रावसाहेब दानवेंनी निकाला आधीच बॉम्ब फोडला

**मुंबई :** सध्याची राजकीय परिस्थिती पाहाता विधानसभा निवडणुकीच्या निकालाबाबत प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे, राज्यातील दिग्गज नेत्यांचं भवितव्य ईव्हीएममध्ये कैद झालं आहे. एक्झिट पोलनुसार राज्यात कुठल्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळताना दिसत नाहीये, त्यामुळेच निवडणूक निकालापूर्वीच सत्तास्थापनेसाठी आवश्यक असणाऱ्या आमदारांचा आकडा कसा जुळवता येईल? याबाबतच्या हालचाली महायुती आणि महाविकास आघाडीच्या गोटातून सुरू झाल्या आहेत. अपक्ष उमेदवारांना संर्पक साधण्यात येत आहे. मात्र याबाबत बोलताना आम्हाला राज्यात स्पष्ट बहुमत मिळेल, त्यामुळे आम्हाला अपक्ष आमदारांची गरज लागणार नाही, असं वक्तव्य भाजप नेते रावसाहेब दानवे यांनी केलं आहे.

लोकसभेत काँग्रेसनं एक नरेटीव सेट केला त्यामुळे आम्हाला भोगावं लागलं. मात्र यावेळी ते यशस्वी झाले नाहीत. यावेळी परिस्थिती वेगळी आहे. त्यामुळे राज्यात महायुतीचं सरकार बहुमतानं येणार. आम्ही सरकार स्थापन करणार. बहुमत मिळत असेल तर अपक्ष आमदारांना संपर्क साधण्याची गरज काय? आम्ही बहुमतात येत असल्यानं बंडखोरांशी चर्चा करण्याची गरज नाही. बंडखोर हा विषय सत्ता स्थापन झाल्यानंतरचा आहे. बंडखोर अपक्ष असेल आणि त्याला जर महायुतीला पाठिंबा द्यायचा असेल तर आम्ही त्यांचे स्वागत करू, असं दानवे यांनी



म्हटलं आहे.

दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी पुन्हा एकदा ठाकरे गटाचे नेते संजय राऊत यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. संजय राऊत यांना गांभीर्यानं घेण्याची गरज नाही. वाढलेल्या मतदानाचा टक्का महिलांचा आहे. लाडकी बहिण आमच्या पाठीशी आहे. भारतीय जनता पार्टीला कुठेही नुकसान नाही. लोकसभेला जी परिस्थिती होती ती आता सुधारली आहे. एकनाथ शिंदे हे पूर्णपणे भाजप आणि मित्र पक्षांच्या सोबत आहेत. त्यामुळे कार्यकर्ते काहीही बोलले तरी त्याला काही अर्थ नाही. जो मुख्यमंत्री यांचा निर्णय तोच कार्यकर्त्यांचा निर्णय असेल, महायुती पूर्णपणे बहुमतात येऊन सरकार स्थापन करेल जर अपक्ष आमदाराला पाठिंबा द्यायचा असेल तर ते देऊ शकतात, असंही यावेळी दानवे यांनी म्हटलं आहे.

Daily Rajya Loktantra Date : 23-11-2024

**Change Of Name**

I Have Change My Name From
Old Name
ASHWINI DNYANDEV SHINDE
New Name
ASHWINI SHIVDAS MIRKAD
As Per My Documents
Address- H.NO 02 RUSHI PARK AMBAD
CHAUFULY JALNA DIST JALNA 431203

# मराठवाड्यातील रब्बी पिकांसाठी कृषी तज्ज्ञांचा सल्ला!

परभणी : सध्या काही ठिकाणी रब्बी हंगामाची लागवड सुरु आहे. तर काही पिकात आंतरमशागतीची कामे सुरु आहेत. अगोदर लागवड झालेल्या काही पिकांवर किडी आणि रोगांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. सध्याच्या परिस्थितीत विविध पिकांचे नियोजन कसे करावे यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठातील तज्ज्ञांनी खास मराठवाड्याच्या शेतकऱ्यांसाठी कृषी सल्ला दिलेला आहे.

रबी पिकांसाठी कृषी तज्ज्ञांच्या शिफारशी :

ऊस -पूर्व हंगामी उसाची लागवड लवकरात लवकर संपवावी. ऊस लागवड करतांना ३० किलो नत्र, ८५ किलो स्फुरद व ८५ किलो पालाश (३२७ किलो १०:२६:२६ किंवा १८५ किलो डायअमोनियम फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश किंवा ६५ किलो युरिया + ५३१ किलो सिंगल सुपर फॉस्फेट + १४२ किलो म्युरेट ऑफ पोटॅश) प्रति हेक्टरी खतमात्रा द्यावी. ऊस पिकावर खोड किडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २० % २५ मिली किंवा क्लोरॅट्रानोलीप्रोल १८.५% ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. ऊस पिकावर पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० % ३६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

हळद -हळद पिकात कंदमाशीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी



१५ दिवसांच्या अंतराने क्विनालफॉस २५% २० मिली किंवा डायमिथोएट ३० % १५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून-पालटून फवारणी करावी. (हळद पिकावर केंद्रीय किटकनाशक मंडळातर्फे लेबल क्लेम नसल्यामूळे विद्यापिठ शिफारशीत संशोधनाचे निष्कर्ष दिले आहेत). हळदीचे उघडे पडलेल कंद मातीने झाकून घ्यावेत. हळद पिकात आवश्यकतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे. हळदीच्या पानावरील ठिपके / करपा रोग याच्या व्यवस्थापनासाठी अझोक्सिस्ट्रॉबिन १८.२% + डायफेनकोनॅझोल ११.४% (पुर्वमिश्रित बुरशीनाशक) १० मिली + ५ मिली स्टीकरसह प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

हरभरा -जोमदार वाढीसाठी हरभरा पीक सुरुवातीपासूनच तण विरहीत ठेवणे आवश्यक आहे. पीक २० ते २५ दिवसाचे असतांना पहिली कोळपणी करावी. मागील काही दिवसात किमान तापमानात झालेल्या घटीमूळे, वेळेवर लागवड केलेल्या करडई पिकात माव्याचा प्रादुर्भाव दिसून येत आहे, व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३०% १३ मिली किंवा असिफेट ७५% १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

करडई - करडई पिकात तणांच्या व्यवस्थापनासाठी पेरणीनंतर २५ ते ५० दिवसापर्यंत एक ते दोन कोळपण्या व खुरपणी करून घ्यावी.

ज्वारी - लवकर पेरणी केलेल्या रब्बी ज्वारी पिकात लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास व्यवस्थापनासाठी इमामेक्टीन बेन्झोएट ५ टक्के ४ ग्रॅम किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील किटकनाशकांची आलटून पालटून पावसाची उघड बघून फवारणी करावी. फवारणी करत असतांना किटकनाशक पोंग्यात पडेल अशाप्रकारे फवारणी करावी.

फळबागेचे व्यवस्थापन : संत्रा/मोसंबी बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर तसेच जिब्रॅलिक ॲसिड १ ग्रॅम प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. संत्रा/मोसंबी बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनुसार पाणी द्यावे. डाळींब बागेत फळवाढीसाठी ००:००:५० १५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. डाळींब व चिकू बागेत आंतरमशागतीची कामे करून तण नियंत्रण करावे व आवश्यकतेनूसार पाणी द्यावे.




### महत्वाच्या घटना

१९२४ : एडविन हबल यांनी 'देवयानी'ही एक आकाशगंगा आहे असे प्रतिपादन केले.
१९५५ : कोकोज आयलंड्स या बेटांचा ताबा इंग्लंडकडून ऑस्ट्रेलियाकडे देण्यात आला.
१९३६ : लाइफ मॅगझिन हे फोटो मॅगझिन म्हणून पुन्हा प्रकाशित झाले.
१९७१ : चीनने संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीत प्रथमच भाग घेतला.
१९९२ : आयबीएम सायमन हा पहिला स्मार्टफोन प्रकाशित करण्यात आला.
१९९९ : नागपूरचे संस्कृत महाकवी व संस्कृत पत्रकार डॉ. श्रीधर भास्कर वर्णेकर यांना या क्षेत्रातील कठोर तपश्चर्येबद्दल 'अप्पाशास्त्री राशिवडेकर पुरस्कार' प्रदान

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

८७० : बायझँटाईन सम्राट अलेक्झांडर यांचा जन्म. (मृत्यू: ६ जून ९१३)
१७५५ : थॉमस लॉर्ड लॉर्डस क्रिकेट ग्राउंडचे संस्थापक (मृत्यू: १३ जानेवारी १८३२)
१८८२ : वालचंद हिराचंद दोशी उद्योगपती (मृत्यू: ८ एप्रिल १९५३)
१८९७ : निराद सी. चौधरी साहित्य अकादमी पुरस्कार विजेते (१९७५) बंगाली/इंग्लिश लेखक. १९५१ मधे त्यांचे 'ॲन आटोबायोग्राफी ऑफ ॲन अननोन इंडियन' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाले. त्याच्या १४ आवृत्या निघाल्या. (मृत्यू: १ ऑगस्ट १९९९ लॅथबरी रोड, ऑक्सफोर्ड, इंग्लंड)
१९२३ : नागनाथ संतराम तथा 'ना. सं.' इनामदार लेखक (मृत्यू: १६ आक्टोबर २००२)
१९२६ : सत्यनारायण राजू ऊर्फ 'सत्य साईबाबा' आध्यात्मिक गुरू (मृत्यू: २४ एप्रिल २०११)
१९३० : गीता दत्त अभिनेत्री आणि गायिका (मृत्यू: २० जुलै १९७२)
१९६१ : पापा जॉन पिझ्झा चे संस्थापक जॉन साटनर यांचा जन्म.
१९६७ : गॅरी कर्स्टन दक्षिण अफ्रिकेचे क्रिकेटपटू, प्रशिक्षक
१९८४ : अमृता खानविलकर अभिनेत्री वालचंद हिराचंद दोशी उद्योगपतीवालचंद हिराचंद दोशी उद्योगपती

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९३७ : जगदीशचंद्र बोस नोबेल पारितोषिक विजेते भारतीय वनस्पतीशास्त्रज्ञ, वनस्पतींमधील प्रतिक्षिप्त क्रियांवर मूलभूत संशोधन (जन्म: ३० नोव्हेंबर १८५८)
१९५९ : 'नटवर्य' चिंतामणराव कोल्हटकर अभिनेते व निर्माते (जन्म: १२ मार्च १८९१)
१९७० : सिंगापूर देशाचे पहिले अध्यक्ष युसूफ बिन इशक यांचे निधन. (जन्म: १२ ऑगस्ट १९१०)
१९८९ : भारतीय-अमेरिकन अभिनेत्री मरले ओबर्नॉन यांचे निधन. (जन्म: १९ फेब्रुवारी १९११)
१९९३ : ब्रूनो रॉस्सी पृथ्वीच्या चुंबकीय क्षेत्रामुळे होणार्या वैश्विक किरणांच्या विकीरणा विषयी संशोधन करणारे इटालियन-अमेरिकन पदार्थवैज्ञानिक (जन्म: १३ एप्रिल १९०५ व्हेनिस, ईटली)
१९९९ : कुमुद सदाशिव पोरे अर्थतज्ज्ञ व सामाजिक कार्यकर्त्या
२००० : बाबूराव सडवेलकर चित्रकार, कलासमीक्षक, महाराष्ट्राचे कलासंचालक (जन्म: २८ जून १९२८ सावंतवाडी, सिंधुदुर्ग, महाराष्ट्र)
२००६ : झेटा मासिकचे सहसंस्थापक जेस ब्लँकोनेलसला यांचे निधन. (जन्म: १४ नोव्हेंबर १९३६)

## ऊस पाचट न जाळता शेतातच कुजवा



उसतोड झाल्यानंतर बरेच शेतकरी शेतात शील्लक राहिलेल पाचट जाळून टाकतात. पाचट जाळल्यामुळे प्रदुषण तर होतच शिवाय जमिनीतील उपयुक्त सुक्ष्मजिवाणू देखील नष्ट होतात. हे टाळायच असेल तर शेतात उसाच्या पाचटाचे अच्छादन करुन हे पाचट शेतातच कुजवण गरजेच आहे. शेतात पाचट अच्छादनाचे फायदे काय आहेत याविषयीची माहिती आपण या व्हिडीओतून घेणार आहोत. पीक वाढीनुसार पाण्याचे अयोग्य व्यवस्थापन, जमिनीतील कमी होणारे सेंद्रिय कर्बाचे प्रमाण यामुळे ऊस उत्पादनावर परिणाम होत आहे. यावर ऊस पाचट व्यवस्थापन हा एक चांगला उपाय आहे. एक हेक्टर ऊस क्षेत्रातून सुमारे ८ ते १२ टन पाचट मिळत, त्यापासून ५ ते ६ टन सेंद्रिय खत खोडवा पिकाला मिळते. पाचटाचे विघटन होत असताना त्यामध्ये असणार ४० ते ५० किलो नत्र, २० ते ३० किलो स्फुरद आणि ७५ ते १०० किलो पोटॅश पुढील पिकास उपलब्ध होत. ऊस तोडणीनंतर ७० टक्के शेतकरी शेतात उरलेल पाचट जाळून टाकतात. त्यामुळे केवळ ५ टक्के म्हणजे सुमारे हेक्टरी ५०० किलो पाचटाची राख शिल्लक राहते. तसेच मोठ्या प्रमाणात हवेचे प्रदूषण होऊन उष्णतेने जमीन आणि त्यातील उपयुक्त जिवाणू आणि गांडुळावर परिणाम होतो.

पाचट आच्छादनाचे फायदे काय आहेत? ऊस तोडणी झाल्यानंतर शेतकरी उसाचे पाचट जाळून टाकतात, सर्व सरीच्या बगला फोडून रासायनिक खताची मात्रा देऊन पाणी दिल जात. पाणी आणि खते गरजेपेक्षा जास्त प्रमाणात वापरले तर तणांची मोठ्या प्रमाणात वाढ होते. उसाचे पाचट न जाळता ते एक आड एक सरीमध्ये पसराव. किंवा सर्व सरीत पाचट दाबून बसवावे. हे पाचट शेतात आच्छादनाच काम तर करतच. याशिवाय पाचट कालांतराने कुजल्यानंतर त्यापासून पिकाला चांगल सेंद्रिय खत देखील मीळत. पाचटाच्या आच्छादनामुळे जागेवर तण उगवत नाही. उसाला जी खते दिली जातात त्या खतांचा अपव्यय होत नाही. तण व्यवस्थापनावरील होणाऱ्या खर्चात बचत होते.

## हळदीमध्ये कीड-रोग व्यवस्थापनावर भर

अर्धापूर तालुक्यात कोंढा शिवारात माधवराव दादाराव कदम यांच्या एकत्रित कुटुंबाची साधारण २० एकर जमीन आहे. त्यात अडीच एकरांमध्ये हळद लागवड केलेली आहे. मागील वीस वर्षांपासून ते हळद लागवड करत आहेत. काही वर्षांपूर्वी सरीमध्ये हळद लागवड करीत असत. परंतु त्यात बदल करून माधवराव यांनी बेडवर हळद लागवड करण्यास सुरुवात केली.

योग्य नियोजन केल्यास दरवर्षी एकरी साधारण २२ ते २५ क्विंटल हळद उत्पादन मिळते, असे माधवराव सांगतात. याशिवाय त्यांच्याकडे सोयाबीन ६ एकर, ऊस ६ एकर, केळी बाग अडीच एकर अशी वैविध्यपूर्ण पिकांची लागवड आहे. लागवडपूर्व नियोजन : या वर्षी अडीच एकर क्षेत्रामध्ये हळद करण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यासाठी लागवडीच्या ४ महिने अगोदर जमिनीची ट्रॅक्टरच्या साह्याने चांगली खोल नांगरट करून घेतली. त्यानंतर एकरी ३ ट्रॉली चांगले कुजलेले शेणखत शेतात टाकून रोटावेटर मारून घेतला. आणि लागवडीसाठी ट्रॅक्टरच्या साह्याने साडेचार फुटांचे बेड तयार केले. बेडवर दोन ओळी ९ इंच, तर दोन बेण्यात ७ इंच अंतर राखत १ जुलैला लागवड केली. संपूर्ण क्षेत्रामध्ये हळदीच्या सेलम जातीची लागवड केली. लागवडीसाठी एकरी साधारण आठ क्विंटल बेणे लागले. लागवडीपूर्वी बेण्यास शिफारशीत घटकांची बेणे प्रक्रिया केली जाते. त्यामुळे कीड-



रोगांचा प्रादुर्भाव टाळण्यास मदत होतो. बेणे प्रक्रिया करण्यावर विशेष भर दिला जातो. रासायनिक खत व्यवस्थापन : लागवडीपूर्वी सिंगल सुपर फॉस्फेट १५० किलो, पोटॅश ५० किलो, युरिया ५० किलो याप्रमाणे रासायनिक खतांचे बेसल डोस बेडवर दिले. त्यानंतर ९ एचपी पॉवर टिलरच्या साह्याने माती लावून बेड व्यवस्थित करून घेतले. लागवडीनंतर १५ दिवसांनी सरीमध्ये पेरून तो ४५ दिवसांनी पॉवर टिलरच्या साह्याने जमिनीत गाढला जातो. यामुळे जमिन भुसभुशीत होऊन उत्पादनात वाढ होते. उगवणीनंतर ५० दिवसांनी १०० किलो डीएपी, तसेच दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या मात्रा ३० किलो प्रमाणे देण्यात आल्या. लागवडीनंतर तीन महिन्यांनी १२:६१:०, ०:५२:३४, पोटॅश यांचा ठिबकद्वारे वापर केला. लागवडीनंतर साधारण ३ महिन्यांनी या मात्रा देण्यास सुरुवात केली जाते. कीड-रोग व्यवस्थापन : हळद पिकामध्ये विविध कीड-रोगांचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यासाठी पिकाचे सातत्याने निरीक्षण केले जाते. विशेषतः हुमणीचा प्रादुर्भाव दिसून येतो. त्यासाठी रासायनिक कीटकनाशकांचा वापर केला. कीड-रोगांचा प्रादुर्भाव पाहून आवश्यकतेनुसार रासायनिक बुरशीनाशक तसेच कीटकनाशकांच्या फवारण्या घेतल्या जातात. पानांवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यानंतर शिफारशीप्रमाणे रासायनिक बुरशीनाशकांच्या फवारण्या घेतल्या आहेत. आगामी नियोजन : सध्या लागवड होऊन ४ महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. येत्या काळात पिकास ठिबकद्वारे सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या मात्रा देण्यात सातत्य राखले जाईल. पिकाचे सातत्याने निरिक्षण केले जाईल. आवश्यकतेनुसार रासायनिक फवारण्या घेतल्या जातील. साधारण २० जानेवारीला पिकास पाणी देणे बंद केले जाईल. त्यानंतर फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवड्यात हळद काढणी सुरुवात केली जाईल.

## सोयाबीन, कापूस उत्पादक शेतकऱ्यांना प्रति हेक्टरी अतिरिक्त ५ हजार रुपये देणार



नवी दिल्ली: सोयाबीन आणि कापूस उत्पादक शेतकऱ्यांच्या बँक खात्यांमध्ये हेक्टरी ५,००० रुपये अतिरिक्त देण्याबाबत केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान प्रसारमाध्यमांना संबोधित करताना बोलले.

सोयाबीन आणि कापूस उत्पादकांना त्यांच्या खात्यात हेक्टरी ५,००० रुपये अतिरिक्त दिले जात आहेत. मलेशिया आणि इंडोनेशियातील खाद्यतेलांवरील आयात शुल्क देखील प्रभावीपणे २७.५ टक्क्यांपर्यंत वाढविण्यात आले आहे जेणेकरून देशांतर्गत बाजारपेठेतील तेल गिरण्या घरगुती शेतकऱ्यांकडून सोयाबीन खरेदी करतात. आणि त्यांना योग्य किंमत द्यावी जेणेकरून सोयाबीन खरेदी दरम्यान ओलावा असेल १२ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत

### केंद्रीय कृषिमंत्री यांची माहिती!

वाढले आहे,'' असेही ते म्हणाले. केंद्रीय मंत्र्यांनी भावांतर भुगतान योजनेबाबतही भाष्य केले. भावांतर भुगतान योजना हा एक कार्यक्रम आहे ज्यामध्ये सरकार आणि शेतकरी ज्या दराने त्यांची पिके विकतात त्यामधील फरकासाठी शेतकऱ्यांना भरपाई देते, जे तुलनेने जास्त आहे. ''आमच्या योजनांपैकी एक म्हणजे भावांतर भुगतन योजना. त्यांना थेट पुरवठा कसा करायचा आहे किंवा एमएसपी वापरायचा आहे आणि शेतकऱ्यांच्या खात्यात पैसे कसे जमा करायचे आहेत ते सरकारवर अवलंबून आहे. दुसऱ्या मॉडेल दर योजनेत, बटाटे, कांदा आणि टोमॅटो सारख्या पिकांसाठी मॉडेल दर आणि उत्पादन खर्चावर ५० टक्के नफा दिला जाणार हे ठरवेल. यामुळे जेव्हा किरकोळ खर्च कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांना तोटा सहन करावा लागणार नाही. तिसरी वाहतूक खर्च योजना असून याद्वारे शेतकरी पूर्वी जे वाहतूक खर्च भरत असत, ते सरकार उचलेल. महाराष्ट्रात सोयाबीन एक प्रमुख नगदी पीक प्रामुख्याने दिवाळीच्या अगोदर घेतले जाते, कारण ते शेतकऱ्यांना सणासुदीच्या काळात रक्कम प्रदान करते. विदर्भ आणि मराठवाडा हे प्रदेश सोयाबीनच्या लागवडीसाठी विशेष महत्त्वाचे आहेत.

## रब्बी पिकांत संतुलित अन्नद्रव्ये व्यवस्थापन महत्त्वाचे

राज्यात रब्बी हंगामात हरभरा, गहू, कांदा, करडई, सूर्यफूल इत्यादी मुख्य पिकांची लागवड केली जाते. राज्यात रब्बी पिकांची उत्पादकता कमी आहे. उत्पादन वाढीसाठी खत व्यवस्थापन हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. अधिकाधिक उत्पादन घेण्यासाठी योग्य नियोजनाबरोबरच रासायनिक खतांचा कार्यक्षमतेने वापर होणे आवश्यक आहे. पिकांना योग्य खतांच्या संतुलित मात्रा न दिल्यास उत्पादनातही घट येते. तसेच जमिनीचा पोतही बिघडतो. त्यासाठी रब्बी पिकांनी संतुलित खत आणि पाणी व्यवस्थापन करणे अत्यंत आवश्यक आहे.

गहू : बागायती गहू पिकासाठी हेक्टरी १० टन चांगले कुजलेले शेणखत किंवा कंपोस्ट खत द्यावे. बागायती गव्हाच्या वेळेवर पेरणीसाठी १२० किलो नत्र, ६० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. त्यापैकी निम्मे नत्र, तर स्फुरद व पालाशची संपूर्ण मात्रा पेरणीच्या वेळी द्यावे. उरलेली नत्राची निम्मी मात्रा पेरणीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी झाल्यावर पहिल्या पाण्याच्या वेळी द्यावी. उशिरा पेरणीसाठी ८० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व ४० किलो पालाश द्यावे. निम्मे नत्र व संपूर्ण स्फुरद आणि पालाश पेरणीच्या वेळेस द्यावे. उरलेले निम्मे नत्र पेरणीनंतर तीन आठवड्यांनी खुरपणी झाल्यावर पहिल्या पाण्याच्या वेळी द्यावे. जमिनीमध्ये लोहाची किंवा झिंकची कमतरता असल्यास, २० किलो फेरस सल्फेट किंवा झिंक सल्फेटची मात्रा शेणखतातून द्यावी. (ही मात्रा १०० किलो शेणखतामध्ये १५ दिवस मुरवून त्यानंतर द्यावे). गव्हाचे अधिक उत्पादन



मिळविण्यासाठी शिफारशीत अन्नद्रव्यांची मात्रा देऊन १९:१९:१९ किलो (नत्र: स्फुरद: पालाश) या विद्राव्य खतांची किंवा २ टक्के डीएपी खताची पेरणीनंतर ५५ आणि ७० दिवसांनंतर फवारणी करावी. विद्राव्य खत फवारणीसाठी १९:१९:१९ किंवा डीएपी खताचे २ टक्के द्रावण तयार करण्यासाठी २० ग्रॅम खत मात्रा प्रति लिटर पाण्यात मिसळून घ्यावी.

कांदा : लागवडीपूर्वी १५ दिवस अगोदर २५ ते ३० टन चांगले कुजलेले शेणखत प्रति हेक्टरी प्रमाणे द्यावे. शेणखतासोबत गंधक ४५ किलो प्रति हेक्टरी प्रमाणे १५ दिवस अगोदर द्यावे. लागवडीच्या वेळी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. उर्वरित ५० किलो नत्राची मात्रा दोन समान हप्त्यांत विभागून ३० व ४५ दिवसांनी द्यावी.सूर्यफूल : कोरडवाहू पिकास चांगले कुजलेले शेणखत २.५ टन, तसेच ५० किलो नत्र, २५ किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश प्रति हेक्टरी प्रमाणे पेरणीच्या वेळेस दोन चाड्याच्या पाभरीने पेरून घ्यावे. बागायती पिकास हेक्टरी ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व ३० किलो पालाश द्यावे. उरलेल्या ३० किलो नत्राची मात्रा पेरणीनंतर एक महिन्याच्या आत द्यावी.

गंधकाची कमतरता असलेल्या जमिनीत हेक्टरी २० किलो गंधक पेरणीच्या वेळी गांडूळ खतातून द्यावे.

करडई : करडई हे पीक रासायनिक खतास चांगला प्रतिसाद देते. पिकास ५० किलो नत्र (११०किलो युरिया) आणि २५ किलो स्फुरद (१५६ किलो सिंगल सुपर फॉस्फेट) प्रति हेक्टरी प्रमाणे देणे आवश्यक आहे. ही खते पेरणीच्या वेळेस दोन चाड्याच्या पाभरीने पेरून द्यावीत. बागायती करडई पिकास ६० किलो नत्र, ३० किलो स्फुरद प्रति हेक्टरी द्यावे.

हरभरा : खरीप हंगामात जमिनीत शेणखताची मात्रा दिली नसल्यास, रब्बी पिकांसाठी चांगले कुजलेले शेणखत हेक्टरी ५ टन प्रमाणे पेरणीपूर्वी द्यावे. हरभरा पिकास पेरणी करताना २५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ३० किलो पालाश प्रति हेक्टरी द्यावे. किंवा हेक्टरी १२५ किलो डीएपी आणि ५० किलो म्युरेट ऑफ पोटॅश पेरणीच्या वेळी बियाण्यालगत पडेल या पद्धतीने दुचाडी पाभरीने पेरून द्यावे. खतमात्रा विस्कटून देऊ नये. पीक फुलोऱ्यात असताना आणि घाटे भरण्याच्या अवस्थेमध्ये असताना किंवा या अवस्थेत पाण्याचा ताण पडल्यास २ टक्के युरिया किंवा २ टक्के डीएपीची फवारणी करावी. पेरणीनंतर ३० व ४५ दिवसांनी १ टक्का पोटॅशिअम नायट्रेट व २ टक्के डीएपीची स्वतंत्ररित्या फवारणी करावी.

# बीड शहरातील रबर उडुन गेलेले रंबल स्ट्रीप (रबरी गतिरोधके) अपघाताला निमंत्रण

## लोखंडी नट बोल्ट उघडे पडल्याने टायर फुटुन संभाव्य अपघाताचा धोका- डॉ.गणेश ढवळे

बीड । प्रतिनिधी

बीड शहरांतर्गत नव्याने तयार करण्यात आलेल्या धुळे ते सोलापूर सिमेंट काँक्रीट राष्ट्रीय महामार्गावरील वर्दळीच्या ठिकाणी असणारी अपघात प्रवण क्षेत्र असणारी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक, पोलिस अधीक्षक कार्यालय तसेच जिल्हा रुग्णालय याठिकाणी रस्ता क्रॉसींग असुन या ठिकाणी बसविण्यात आलेली रंबल स्ट्रीप (रबरी गतिरोधके) दुरावस्थेत असुन तुटल्याने रबर उडुन गेल्याने गतिरोधकाचे लोखंडी नट बोल्ट उघडे पडले असुन त्यामुळे वाहनांचे टायर पंक्चर होऊन अथवा फुटुन अपघाताचा धोका वाढला असुन तातडीने नविन रंबल स्ट्रीप (रबरी गतिरोधक) बसविण्यात यावेत अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते तथा बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी नितिन गडकरी, प्रकल्प संचालक तथा व्यवस्थापक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर,कार्यकारी अभियंता राष्ट्रीय महामार्ग बीड, जिल्हाधिकारी बीड, पोलिस अधीक्षक बीड यांना लेखी निवेदनाद्वारे केली



असुन आठवडाभरात नविन गतिरोधक न बसवल्यास दि.०२ सोमवार रोजी पोलिस अधीक्षक कार्यालयासमोर रास्ता रोको आंदोलन करण्याचा ईशारा दिला आहे.

अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या ठिकाणी नागरीकांकडुन गतिरोधक बसविण्याची मागणी करण्यात येते त्याठिकाणी नागरीकांचा रोष कमी करण्यासाठी उपाययोजना म्हणून गतिरोधक बसविण्यात येतात.मात्र त्याची नंतर देखभाल करण्यात येत नसुन आता हेच गतिरोधक अपघातांना कारणीभूत ठरत असुन रबरी गतिरोधक तुटल्याने रबर उडुन गेल्याने उघडे पडलेल्या लोखंडी नट बोल्ट मुळे वाहनांचे टायर पंक्चर अथवा फुटून अपघात होत आहेत. त्यामुळे तातडीने नविन गतिरोधक बसविण्यात यावीत अशी मागणी करण्यात आली आहे.गेल्यावर्षी ४ ऑक्टोबर २०२३ रोजी बीड शहरांतर्गत अपघात प्रवण क्षेत्र असलेल्या जिल्हा रुग्णालय क्रॉसिंग ,पोलीस अधीक्षक कार्यालय समोर , लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकामध्ये रबरी गतिरोधकांचे रबर रबर उडुन केवळ लोखंडी नट बोल्ट शिल्लक राहिल्याने वाहनधारकांना त्रास होत होता त्याचबरोबर वाहनांचे टायर फुटुन अपघाताचा धोका वाढला होता.संबधित प्रकरणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी लेखी निवेदनाद्वारे तत्कालीन पोलीस अधीक्षक बीड नंदकुमार ठाकूर यांना दि.९ ऑक्टोबर रोजी रास्तारोको आंदोलनाचा ईशारा दिल्यानंतर याची तात्काळ दखल घेत शिवाजीनगर पोलिस ठाण्याचे निरीक्षक केतन राठोड यांना संबंधित प्रकरणी राष्ट्रीय महामार्गाचे व्यावस्थापक यांना आवश्यक उपाययोजना करणेबाबत तातडीने गतिरोधकाची दुरुस्ती करण्याचे कळवले होते.त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नविन गतिरोधक बसविण्यात आले होते. त्याचप्रमाणे विद्यमान पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ यांनी कारवाई करतील अशी अपेक्षा डॉ.गणेश ढवळे यांनी व्यक्त केली आहे.

# मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासनाची तयारी पूर्ण



जालना। प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाचे निरीक्षक (सामान्य) जालना यांच्या उपस्थितीमध्ये जालना जिल्ह्यातील पाच विधानसभा मतदार संघामधील अंतर्गत मतमोजणीसाठी मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक आणि सुक्ष्म निरीक्षकांचे सरमिसळीकरण (रॅण्डमायझेशन) प्रक्रिया पार पडली. तरी जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१- जालना, १०२-बदनापूर आणि १०३- भोकरदन विधानसभा मतदारसंघातील मतमोजणी दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता होणार असून मतमोजणीसाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले आहे, अशी माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली.

जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघासाठी दि.२२ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता मतमोजणीस्थळी सर्व मतमोजणी पर्यवेक्षक, मतमोजणी सहायक आणि सुक्ष्म निरीक्षक अशा एकुण ४२५ अधिकारी-कर्मचाऱ्यांची त्या त्या विधानसभा मतदारसंघ स्तरावर रंगीत तालिम घेण्यात आली. तसेच भारत निवडणूक निरीक्षक, निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली प्रशिक्षण घेण्यात आले. सर्व विधानसभेसाठी दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वाजता सर्व विधानसभा मतदार संघामध्ये मतमोजणीस्थळी मतमोजणी करण्यात येणार आहे.

पाच विधानसभा मतदारसंघासाठी पोस्टल बॅलेट मतमोजणी टेबल ३९, पर्यवेक्षक ४९, सहायक ४७, सुक्ष्म निरीक्षक ४९, एकुण मनुष्यबळ १४५, ईटीबीपीएस मतमोजणी टेबलची संख्या ९, मतमोजणी पर्यवेक्षक १०, मतमोजणी सहायक ११, एकुण मनुष्यबळ २१, ईव्हीएम मतमोजणी टेबलची संख्या ७०, मतमोजणी पर्यवेक्षक ८५, मतमोजणी सहायक ९०, सुक्ष्म निरीक्षक ८४, एकुण मनुष्यबळ २५९ आणि मतमोजणीसाठी लागणारे राखीवसह मनुष्यबळ एकुण ४२५ याप्रमाणे नेमणूक करण्यात आली आहे. असे प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# कल्याण अधिकारी ( प्र ), औष्णिक विद्युत केंद्रा यांच्या लेखी पत्राने उपोषण स्थगीत-आगळे



परळी। प्रतिनिधी

औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ मधील कंत्राटी कामगारांना १९% मूळ किमान वेतनामुळे मासिक वेतनात झालेली वाढ व एक एप्रिल २०२४ पासून ची थकबाकी आणि दिवाळी बोनस सह माहे ऑक्टोबर २०२४ चे वेतन दिवाळी आधी कंत्राटी कामगारांना न मिळाल्यामुळे दिनांक १९ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता औष्णिक विद्युत केंद्र,परळी वैजनाथ, कार्यालयासमोर कामगार प्रतिनिधी यांनी आमरण उपोषण सुरू केले होते, ते सायंकाळी ५:४५ वाजता कल्याण अधिकारी ( प्र ) शरद राठोड यांनी लेखी पत्र दिल्यामुळे सकाळी ११ वाजता सुरू केलेले आमरण उपोषण सायंकाळी ०५: ४५ वा. तूर्तास स्थगित करण्यात आले,असे एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे रोजंदारी मजदूर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी कळविले आहे.

डॉ. नितीन वाघ कार्यकारी संचालक ( मासं ) ( प्र ) महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी बांद्रा ( पूर्व ) या कार्यालयाने एक परिपत्रक दिनांक १४ ऑक्टोबर २०२४ रोजी निर्मित केले होते त्यात त्यांनी दिनांक २४/९ /२०२४ अन्वये वीज कंत्राटी कामगारांच्या विविध मागण्यांच्या अनुषंगाने मा.ना. उपमुख्यमंत्री तथा मंत्री( ऊर्जा ) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ०९ / ०९ / २०२४ रोजी मुंबई येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत महानिर्मिती, महापारेषण व महावितरण कंपनीमधील बाह्य स्त्रोतामधून काम करणाऱ्या कंत्राटी कामगारांच्या मूळ वेतनामध्ये बेसिक मध्ये १९% इतकी वाढ दिनांक ०१/०४/ २०२४ पासून करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याने त्याची अंमलबजावणी तिन्ही कंपन्यांनी करणे बाबत कळविण्यात आले होते. कार्यरत बाह्य स्त्रोत कंत्राटी कामगारांना सुधारित मूळ वेतनाचा बेसिक मध्ये लाभ ऑक्टोबर २०२४ च्या वेतनात देण्यात यावा व केलेल्या कारवाईचा अहवाल सांघिक कार्यालयास सादर करण्यात यावा असे नमूद केले होते. त्याप्रमाणे कंत्राटी कामगारांच्या त्यांच्या हक्काचा मेहनताना त्यांच्या बँकेच्या खात्यात जमा करावा याकरिता मुख्य अभियंता, औष्णिक विद्युत केंद्र च्या कार्यालयासमोर रोजंदारी मजदूर सेना केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांच्या नेतृत्वाखाली तर स्वाभिमानी महानिर्मिती कंत्राटी कामगार संघटना संयुक्त कृती समितीचे मार्गदर्शक नचिकेत मोरे तसेच अध्यक्ष कॉम्रेड वामन बुटले यांच्या मार्गदर्शनाखाली कामगार प्रतिनिधींनी सकाळी ११ वाजता अमर उपोषणास सुरुवात केली होती त्या अनुषंगाने कल्याण अधिकारी औष्णिक विद्युत केंद्र परळी वैजनाथ यांनी कंत्राटी कामगारांना पगारात दिलेल्या १९ टक्के वाढीबाबत सविस्तर परिपत्रक निर्गमित करण्याची कार्यवाही मुख्यालय स्तरावर सुरू असून नवीन कंत्राटामध्ये वाढीव दर समाविष्ट केलेले आहे. तसेच तालुक्यात विधानसभा निवडणूक आचारसंहिता लागू असल्याने आपले दिनांक १९ / ११/ २०२४ रोजी पासून सुरू असलेले अमरण उपोषण मागे घेऊन प्रशासनास सहकार्य करावे असे पत्र दिल्यामुळे मुख्य अभियंता, औष्णिक विद्युत केंद्राच्या कार्यालया समोरील आमरण उपोषण सायंकाळी ५:४५ वा. तुर्तास स्थगित करण्यात आले, असे एका प्रसिद्धकांद्वारे रोजंदारी मजदूर सेनेचे केंद्रीय महासचिव भाई गौतम आगळे सर यांनी कळविले आहे.

# व्यापारी महासंघाचा मराठवाडातील सर्व जिल्ह्याचा संपर्क दौरा

## व्यावसायिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे - हस्तीमल बंब

जालना। प्रतिनिधी

कॅन्फेडरेशन ऑफ ऑल ईंडिया ट्रेडर्स (कॅट) च्या अंतर्गत व्यापारी महासंघ च्या मराठवाडातील सर्व जिल्ह्याचा संपर्क दौरा नवनिर्वाचित विभागीय अध्यक्ष हस्तीमल बंब यांच्या नेतृत्वाखाली आयोजित करण्यात आले आहे.

या दौर्यात सचिव सुखदेव बजाज, सहसचिव गोविंद साखला, सुभाष सोनुने, राम मोहिते, महिला आघाडीची अध्यक्षा सौ. सिता मोहिते पाटील, सचिवा सौ. आनंदी अय्यर, प्रिया जोशी इ. पदाधिकारी सहभागी होणार आहे. या दौर्याचा तपशील वार दि. ३० नवंबर २०२४ शनिवार रोजी सकाळी ९:०० वा. परभणी, दुपारी १:०० वा. हिंगोली, सायंकाळी ७:०० वा. नांदेड तसेच १ डिसेंबर २०२४, रविवार रोजी सकाळी ९:०० वा. लातुर, दुपारी १:०० वा. धाराशिव, सायंकाळी ५:०० वा. बीड, रात्री ८:३० वा. छत्रपति संभाजीनगर आणि दि. २ डिसेंबर रोजी सकाळी १०:०० वा. जालना येथे व्यापार्यांची बैठक आयोजित करण्यात आली आहे. या दौर्याचे मुख्य उद्देश्य नुकतेच श्री बंब यांची मराठवाडा विभागीय अध्यक्ष पदी निवड झालेली आहे. प्रत्येक जिल्ह्यात लहान मोठे सर्व प्रकारचे उद्योग व्यवसाय करणारे महिला-पुरुष यांना एकजुट करणे, संघटीत करणे व प्रत्येक जिल्ह्यातील तालुका, ग्रामीण भागा पर्यंत संघटनेची शाखा उघडणे व जास्तीत-जास्त व्यापार्यांना सभासद करून संघटनेत समाविष्ट करणे असे आहे. शासकिय किंवा खासगी नौकरी मिळणे अवघड आहे. महागाई सुध्दा वाढत चाललेली आहे. पुर्वी संयुक्त परिवार होते, सध्या कुटुंब चालविण्यासाठी महिलांनी सुध्दा उद्योग व्यवसायात पुढे यावे. त्या करिता व्यापारी महासंघात महिलांना सुध्दा आरक्षण देण्यात आले आहे. राष्ट्रीय व राज्य कार्यालयातून सभासद योजना सुरक्षतेसाठी विमा योजना राबविण्यात येत आहे. प्रत्येक सभेत महिला-पुरुष, अध्यक्ष पदाधिकार्यांची निवड करून कार्यकारिणीचे गठण करण्यात येईल. *या दौर्या व सभेची पुर्व तैयारीसाठी ऋषिकेश साकनुर, नरेश लालवाणी, राहुल बंग, मधु मामदे, हर्षद शाह, दिनेश गिल्डा, लक्ष्मीकांत जाधव, संतोष सोनी, कचरु वेळंजकर, अजय शाह, संतोष कावळे इ. परिश्रम घेत आहे. तरी प्रत्येक जिल्हास्तरीय बैठकीत व्यापार्यांनी आवर्जुन उपस्थित रहावे, असे आव्हान विभागीय अध्यक्ष हस्तीमल बंब यांनी केले आहे.

# प.पू. दादा महाराज खडकीकर पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह

बीड। प्रतिनिधी

बीड येथे रामतिर्थावर प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर यांच्या एकोणिसाव्या पुण्यतिथी निमित्त व श्री. विद्यागुरु खडकीकर यांच्या मार्गदर्शनाखाली अखंड हरिनाम सप्ताह व विविध धार्मिक कार्यक्रम सोहळा शनिवार दि.२३ नोव्हेंबर पासुन ते शनिवार ३० नोव्हेबर २०२४ पर्यंत आयोजित केला आहे.

यामध्ये गुरुचरित्र पारायण व श्रीरामकथा व कीर्तनाचे आयोजन असून दैनिक कार्यक्रमामध्ये पहाटे ४ ते ५ काकडा, ५ ते ६ श्रीविष्णूसहस्त्रनाम, सकाळी ६ ते ७ योगशिबिर, सकाळी ८ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण, सकाळी ८ ते ११ गुरुचरित्र पारायण, ११ ते १२ श्रींच्या समाधीला अभिषेक व आरती, दुपारी २ ते ५ भागवतकथा, सायंकाळी ६ ते ८ हरिपाठ व आरती, रात्री ११ नंतर हरिजागर होईल. भागवतकथा प्रवक्ते हभप भागवताचार्य आबादेव महाराज माजलगांवकर यांच्या अमृतवाणीतून सात दिवस भागवत कथा दररोज दुपारी २ ते ५ वा. होईल. या सोहळ्याची सुरुवात भव्य शोभायात्रेने शनिवार दि.२३ नोंव्हेंबर रोजी सकाळी ११:३० वा. विठ्ठल मंदिर ते कथास्थळापर्यंत होईल.

दररोज रात्रौ ९ ते ११ या वेळेत खालीलप्रमाणे कीर्तनाचे कार्यक्रम होतील. दैनिक योगशिबिर दररोज सकाळी ६ ते ७ वा श्रीराम लाखे, एस.आर. ढोरमारे, डॉ.काकाडे, उबाळे व सहकारी यांच्या मार्गदर्शनाखाली होईल. शनिवार दि.२३ नोव्हेंबर रोजी हभप. राधाबाई साळुंके. रविवार दि.२४ रोजी हभप तुकाराम महाराज करंडे, सोमवार दि.२५ रोजी बालकीर्तनकार हभप सोहम सातपुते. मंगळवार दि. २६ रोजी हभप सुधाकर महाराज राऊत. बुधवार दि. २७ रोजी हभप सुर्यकांत महाराज पुरुषोत्तमपुरीकर. गुरुवार दि.२८ रोजी हभप एकनाथ महाराज पुजारी. शुक्रवार दि.२९ रोजी हभप अनिल महाराज जोशी. यांची कीर्तनसेवा होईल. सकाळी ११ ते १:३० श्री. रामेश्वर बाहेती व सहकारी गेवराईकर यांचे सुंदरकांड होईल. सप्ताहाची समाप्ती शनिवार दि.३० नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा श्रीं च्या समाधीस महारुद्राभिषेक होऊन सकाळी ११:३० ते १:३० या वेळी हभप ज्ञानेश्वर महाराज माऊली माजलगांवकर यांचे अमृतुल्य काल्याचे कीर्तन होऊन त्यानंतर महाप्रसाद दु.२ ते ५ या वेळेत होईल. तरी सर्व भाविक भक्तांनी भागवतकथा, कीर्तन श्रवण व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन प.पू.महायोगी दादामहाराज खडकीकर साधकभक्त परिवारातर्फे श्री. विद्यागुरु खडकीकर महाराज यांनी केले आहे.

# रावसाहेब मारगुडे यांचे निधन

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यातील खानापूर येथील रहीवाशी ह.भ.प. रावसाहेब भाऊराव मारगुडे यांचे बुधवारी रात्री उपचारादरम्यान निधन झाले.



मृत्यू समयी ते ८६ वर्षांचे होते. त्यांच्यावर माजलगाव येथील मंगलनाथ स्मशानभुमीत गुरूवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले.

रावसाहेब मारगुडे यांना १२ नोव्हेंबर रोजी एका दुचाकीने धडक दिली होती. त्यात त्यांना मार लागला होता. उपचारासाठी त्यांना माजलगाव येथील संजिवनी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. त्यांच्या प्रकृतीत सुधारणाही झाली होती. मात्र बुधवारी रात्री अचानक त्यांची प्रकृती बिघडली आणि त्यांनी अखेरचा श्वास घेतला. रावसाहेब मारगुडे यांनी अखंडपणे वारकरी सांप्रदायाची सेवा केली. खानापूर गावचे पोलीस पाटील म्हणून त्यांनी अनेक वर्ष काम पाहीले. त्यांच्या निधनाने वारकरी सांप्रदायाची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या पश्चात दोन मुलं, एक मुलगी, सुना नातवंडे असा परिवार आहे. येथील पत्रकार गणेश मारगुडे यांचे ते आजोबा होत. मारगुडे परिवाराच्या दुःखात कार्यारंभ परिवार सहभागी आहे.

# भाऊसाहेब राणे यांची इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिवलसाठी निवड

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा लोळदगाव केंद्र कुर्ला येथील विज्ञान शिक्षक भाऊसाहेब संभाजी राणे यांची इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिवल( आयआयएसएफ) साठी निवड करण्यात आली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय भारत सरकार तर्फे राणे यांची सलग दुसऱ्यांदा विज्ञान क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याची दखल घेऊन इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिवल साठी निवड करण्यात आली आहे. हा फेस्टिवल प्रथमच ईशान्य भारतातील गुवाहाटी - आसाम येथे ३० नोव्हेंबर ते ०४ डिसेंबर २०२४ दरम्यान संपन्न होणार आहे जगभरातील विविध क्षेत्रातील संशोधक , शास्त्रज्ञ या फेस्टिवल मध्ये उपस्थित राहणार आहेत.

विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय , विज्ञान भारती ,विज्ञान तथा औद्योगिक संसाधन परिषद ,नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्रालय ,आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालय ,माहिती आणि प्रसारण मंत्रालय ,ग्रामीण विकास मंत्रालय

> ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांचे टॅलेंट ओळखून या विद्यार्थ्यांना राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकवण्यासाठी जे मी प्रामाणिक प्रयत्न केले आहेत याची फलनिष्पत्ती म्हणून माझी महाराष्ट्रातून सलग दुसऱ्यांदा या इंडिया इंटरनॅशनल सायन्स फेस्टिवल साठी विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालय भारत सरकारकडून निवड करण्यात आली आहे या निवडीमुळे मला बीड जिल्ह्याचे आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाली आहे याचा मला मनापासून आनंद आहे .
>
> **-भाऊसाहेब राणे**



, पर्यावरण , वन आणि हवामान बदल मंत्रालय , आयुष मंत्रालय आणि आसाम सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने हा फेस्टिवल आयआयटी गुवाहाटी या ठिकाणी संपन्न होणार आहे . भारताला विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित जागतिक उत्पादन केंद्र म्हणून उदयास आणणे हा या फेस्टिवलचा मुख्य उद्देश आहे हा फेस्टिवल मेक इंडिया ,आत्मनिर्भर भारत ,जैवतंत्रज्ञान, जैवअर्थशास्त्र अवकाश तंत्रज्ञान आणि भारताची इतर वैज्ञानिक प्रगती जगासमोर ठेवण्यासाठी एक खुले व्यासपीठ म्हणून पुढे येणार आहे .या फेस्टिवल मध्ये चंद्र यान , साय-टेक एक्सपो , सायन्स ओडीसी ,मेक इन इंडिया ,मेक फॉर द वर्ल्ड ,न्यू नालंदा , प्रयाग भारत ,नारी शक्ती, सायन्स हॉथकॉन , यंग सायंटिस्ट कोन्क्लेव्ह , थ्रू लीडर राऊंड टेबल , गुरुकुला आणि स्टार्टअप आदी इव्हेंट चे सादरीकरण या फेस्टिवल मध्ये होणार आहे . या प्रदर्शनाचे मुख्य आकर्षण चंद्रयान- तीनचे संयोजक आणि इस्त्रोचे चेअरमन डॉ.एस. सोमनाथ सर राहणार आहेत. या प्रदर्शनामध्ये जगभरातील विद्यार्थी आणि शिक्षक तसेच संशोधक उपस्थित राहणार आहेत हा फेस्टिवल प्रथमच ईशान्य भारतातील गुवाहाटी आसाम येथे संपन्न होत आहे. राणे यांच्या या निवडीबद्दल जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मा. आदित्य जीवने साहेब , शिक्षणाधिकारी माध्यमिक नागनाथ शिंदे साहेब शिक्षणाधिकारी प्राथमिक भगवान फुलारी साहेब , डायटचे प्राचार्य डॉ. नदाफ सर ,उपशिक्षणाधिकारी मोहन काकडे साहेब ,डायटचे अधिव्याख्याता विक्रम सारुक डायट प्राचार्य डॉ नदाफ सर, गट विकास अधिकारी सानप गटशिक्षणाधिकारी समंदर खान, ,विस्तार अधिकारी सिद्धेश्वर माटे, प्रणिता गंगाखेडकर मॅडम, केंद्रप्रमुख विनोद कांबळे , कुर्ला केंद्राचे मुख्याध्यापक गायकवाड सर , लोळदगाव शाळेचे मुख्याध्यापक बाळासाहेब घाडगे ,अंकुश डाके, शरद पवळ सर , लोळदगावचे सरपंच अजय नाना घोडके, शिक्षण समितीचे अध्यक्ष श्रीराम घोडके ,तुषार पाटील तसेच केंद्रातील सर्व शिक्षकांनी या निवडीबद्दल भाऊसाहेब राणे यांचेअभिनंदन केले आहे.

# अॅड.स्वप्निल गलधर यांच्या निवडीचे लिंबागणेश येथे जल्लोषात स्वागत



लिंबागणेश। प्रतिनिधी

शिवसेना मुख्य नेते माननीय एकनाथजी शिंदे ( मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य) यांच्या आदेशानुसार शिवसेना पक्षाच्या जिल्हा प्रमुखपदी (कार्यक्षेत्र आष्टी/ पाटोदा / गेवराई विधानसभा ) नियुक्ती शिवसेना सचिव संजय पुष्पलता भाऊराव मोरे यांच्या स्वाक्षरीने करण्यात आली असुन वंदनीय हिंदू हृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार आणि धर्मवीर आनंद दिघे साहेब यांची शिकवण यांचा सक्रियपणे प्रचार आणि प्रसार कराल तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास व्यक्त केला आहे.

आज सायंकाळी लिंबागणेश येथे अँड, स्वप्निल गलधर यांची शिवसेना जिल्हाप्रमुख पदी निवड झाल्याबद्दल स्व.अमोलभैय्या गलधर युवा मंच लिंबागणेश यांच्या वतीने गावच्या मुख्य प्रवेशद्वारावर शिवतीर्थ लिंबागणेश याठिकाणी आतिषबाजी करत जल्लोषात स्वागत करण्यात आले.यावेळी '' एकच भैय्या, स्वप्निल भैय्या'' घोषणाबाजी करण्यात आली. यावेळी औदुंबर नाईकवाडे, सय्यद अख्तर, सचिन आगवान,सुरज कदम,करण वायभट,पप्पु अवसरे, अशोक थोरात, हनुमंत थोरात, गणेश तावरे, ओंकार पवार, बालाजी निर्मळ,बबलु आबदार, अशोक कांबळे, योगेश शिंदे, विक्की जाधव,कीरण थोरात, अक्षय थोरात, आप्पा थोरात आदी उपस्थित होते

राज्य लोकतंत्र
महासंग्राम
शिवसेना
शनिवार, दि.२३ नोव्हेंबर २०२४
६

# जिल्ह्यातील सहा विधानसभासाठी सकाळी आठ वाजल्यापासून मतमोजणी सुरू

## परळीचा सर्वात आधी तर आष्टीचा सर्वात शेवटी निकाल लागणार

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सहा विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रत्येक ठिकाणी सकाळी आठ वाजता मतमोजणी सुरू होणार असून प्रथम टपाली मतांची मोजणी होणार आहे.त्यानंतर १४ टेबलवर प्रत्येक तालुक्याची मोजणी होणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी पत्रकार परिषद बोलताना दिली.

यावेळी बोलतांना ते म्हणाले की प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी एक ऑब्झर्वर आणि निरीक्षकाची नियुक्ती करण्यात आली असून निरीक्षकाच्या उपस्थितीत सर्व मतमोजणी होणार आहे. सुरुवातीला एका टेबलवर पोस्टल मतदान मोजण्यात येणार असून त्यानंतर १४ टेबलवर मशीनचे मतदान मोजण्यात येणार आहे. प्रत्येक फेरीनंतर निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांच्या आणि ऑब्झर्वर च्या मान्यतेने फेरी घोषित करण्यात येईल.



परळी येथे सर्वात कमी फेऱ्या म्हणजे २६ फेऱ्या होणार असून सर्वाधिक आष्टी येथे ३२ फेऱ्या होणार आहेत. तसेच गेवराई २९ ,माजलगाव २८, बीड २९, केज ३० अशाप्रकारे मतमोजणी होणार आहे. दुपारी दोन वाजेपर्यंत सर्व विधानसभा मतदारसंघाचा निकाल अपेक्षित असून दोन नंतर अंतिम निकाल घोषित होईल. मात्र त्या त्या विधानसभा मतदारसंघातील अडचणीनुसार वेळेही लागू शकतो असे पाठक यांनी सांगितले. ऑब्झर्वरच्या अधिकारात आम्हाला हस्तक्षेप करता येत नाही असे त्यांनी सांगितले. याच वेळी उमेदवाराच्या मृत्यूनंतर मतदान स्थगित होते का? या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की मतदान प्रक्रिया सुरू झाल्यानंतर एखाद्या उमेदवाराचा मृत्यू झाला तर निवडणूक रद्द होत नाही. याबरोबरच विजय मिरवणुका संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना त्यांनी सांगितले की ज्याचे सर्व अधिकार पोलीस अधीक्षकांकडे असल्याने परवानगी द्यायची की नाही हे ते ठरवतील. निवडणुकीच्या दरम्यान झालेल्या काही अनुचित प्रकारावर बोलताना ते म्हणाले की सहा मतदान केंद्रावर अनुचित प्रकार घडले. घाटनांदुर येथे मशीन फोडण्याचा प्रयत्न झाला मात्र पुढच्या ३० ते ७४ मिनिटात मतदान सुरू करण्यात आले. त्यामुळे सर्व मतदान सुरक्षित आहे .मतदान प्रक्रियेच्या वेळी झालेल्या अनुचित प्रकारावर भाष्य करताना ते म्हणाले की या सर्व प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले असून कॅमेरा बंद करणाऱ्या वरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यावेळी त्यांनी मतदानाची सविस्तर आकडेवारी विषद केली. गेवराई मध्ये दोन लाख ७६ हजार २८३ म्हणजे ७२.७२%, माजलगाव विधानसभा मतदारसंघात २,३६,८८० म्हणजे ६७.२४% ,बीड मतदार संघात २ लाख ३८ हजार ८४५ म्हणजे ६२.१८% ,आष्टी विधानसभा मतदारसंघात दोन लाख ८२ हजार २४६ म्हणजे ७३.०५%, केज मतदार संघात दोन लाख ४५ हजार ७९९ म्हणजे ६३ . ४८%, तर परळी मतदारसंघात दोन लाख ५४ हजार ३८३ म्हणजे ७५.२७ टक्के मतदान झाल्याचे त्यांनी सांगितले. जिल्ह्यात एकूण मतदान १५ लाख ३४ हजार ४३६ एवढे झाले असून याची टक्केवारी ६८.८८% एवढी होते.एकुण मतदानामध्ये महिला मतदारांची संख्या वाढल्याचे दिसून येत आहे. यावेळी पुढे बोलताना निवडणूक निर्णय अधिकारी अविनाश पाठक म्हणाले की प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी काउंटिंग ऑब्जर्वर ची नियुक्ती करण्यात आली असून गेवराई साठी श्रीमती लालतानपुई व्हेंनचॉग, माजलगाव मतदार संघासाठी मनोज कुमार ,बीड मतदार संघासाठी विजयकुमार जयराम, आष्टी मतदारसंघासाठी पूजा अग्रिहोत्री, केज मतदार संघासाठी सुनील आंचीपाक्का यांची तर परळी मतदारसंघासाठी श्रीमती ईला तिवारी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यावेळी पत्रकार परिषदेला सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी महेंद्र कुमार कांबळे, जिल्हा माहिती अधिकारी शाम टरके, निवासी उपजिल्हाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# पो.नि. हरिभाऊ खाडे यांच्या पत्नीकडे ६२ लाखाची बेकायदेशीर मालमत्ता

## बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

पत्नीकडे जवळपास ६ २ लाखाची मालमत्ता सापडली असून त्यांच्याविरुद्ध बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया काल रात्री उशिरापर्यंत चालू होती. लाच घेण्यासाठी प्रोत्साहित करून बेकायदेशीर मालमत्ता गोळा करण्यासाठी सहाय्य केल्याचे उघड झाल्याने बीड शहर पोलीस ठाण्यात हरिभाऊ खाडे यांच्या पत्नी मनीषा खाडे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया रात्री उशिरापर्यंत सुरू होती .



बीड जिल्ह्यातील ज्ञानराधा पतसंस्था, साई अर्बन, मा. जिजाऊ पतसंस्था या पतसंस्थेतील घोटाळ्याप्रकरणी मासाहेब जिजाऊ मल्टीस्टेटचे शिंदे यांना लाच मागितली ही लाच घेताना त्यांना पकडण्यात आल्यानंतर त्यांना निलंबित करण्यात आले. लाच लुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शंकर शिंदे व त्यांच्या टीमने याची कसून चौकशी करून हरिभाऊ खाडे यांच्याकडे असलेल्या मालमत्तेची चौकशी केली. त्यांच्याकडे अवैधरित्या असलेली दोन कोटींची मालमत्ता निदर्शनास आली. ही मालमत्ता त्यांच्या उत्पन्नापेक्षा ११६ . २८ टक्क्यांनी जास्त आहे याप्रकरणी त्यांच्यावर यापूर्वीच गुन्हा दाखल होऊन कलम ७ ,१२ अधिनियम १९८८ झालेला आहे. त्यांची चौकशी केल्यानंतर हरिभाऊ खाडे यांच्या पत्नी सौ. मनीषा हरिभाऊ खाडे यांच्याकडे ६२ लाख ७९ हजार ९५३ रुपयाची मालमत्ता नावे असल्याचे स्पष्ट झाले. हरिभाऊ खाडे यांना मनीषा खाडे यांनी संपत्ती जमा करण्यासाठी आणि ती धारण करण्यासाठी सहाय्य केल्याचे उघड झाले असून मनीषा हरिभाऊ खाडे यांच्या विरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ (संशोधन २०१८ चे कलम १२ प्रमाणे) बीड शहर पोलीस ठाण्यात गुरुवारी रात्री उशिरापर्यंत गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती .या प्रकरणातील चौकशी अधिकारी पोलीस उपाधीक्षक शंकर शिंदे आणि तपास अधिकारी किरण बगाटे यांच्या वतीने ही गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया करण्यात आली.

# मतमोजणी परिसरात कलम १६३ लागु कोणीही कायदा हातात घेऊ नका

**जालना । प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाद्वारे प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यानुसार तात्काळ प्रभावाने आचार संहिता लागु झाली असून जालना जिल्ह्यातील ९९-परतूर, १००-घनसावंगी, १०१-जालना, १०२-बदनापूर, १०३-भोकरदन विधानसभा मतदारसंघात दिनांक २० नोव्हेंबर, २०२४ रोजी मतदान प्रक्रिया होणार असून दिनांक २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

त्याअनुषंगाने जालना जिल्ह्यातील विधानसभा निवडणूकीची संपूर्ण प्रक्रीया शांततेत, निर्भय व न्याय वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीकोनातून आणि कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्यासाठी ज्या ठिकाणी मतमोजणी होणार आहे, त्या ठिकाणी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ लागू करण्यात आले आहे. मतमोजणी केंद्राच्या ठिकाणापासुन २०० मीटर परिसरातील सर्व पक्ष कार्यालय/उमेदवारांचे मंडप, सर्व दुकाने, मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व ईतर

### जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक यांचे आवाहन

ईलेक्ट्रॉनिक उपकरणे, निवडणूकीच्या कामाव्यतिरीक्त खाजगी वाहन व निवडणूक कामाव्यतिरीक्त व्यक्तीस प्रवेश करण्यास प्रतिबंध करणे आवश्यक आहे. जिल्हादंडाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ व पोलीस अधीक्षक अजय कुमार बंसल यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ आदेशाव्दारे खालील कृत्य करण्यास मनाई केली आहे.

मतमोजणी केंद्राचे २०० मीटर परिसरातील सर्व पक्ष कार्यालय/उमेदवाराचे मंडप, सर्व दुकाने ई. तसेच, मोबाईल, कॉर्डलेस फोन, पेजर, वायरलेस सेट, ध्वनीक्षेपके, सर्व प्रकारचे फेरीवाले व इतर इलेक्ट्रॉनिक उपकरणे इत्यादींच्या वापरावर बंदी घालत आहे.निवडणूकीच्या कामाव्यतिरिक्त खाजगी वाहनांना प्रवेश करण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे. मतमोजणी केंद्राचे २०० मीटर परिसरात नियुक्त अधिकारी/कर्मचारी यांना वगळून पाच किंवा पाचपेक्षा जास्त व्यक्ती येण्यास प्रतिबंध करण्यात येत आहे.मतमोजणी केंद्राचे २०० मीटरच्या आत संबंधीत पक्षाचे उमेदवाराच्या चिन्हांचे प्रदर्शन करणेस व निवडणूक विधानसभा सार्वत्रिक निवडणूक कामकाजासाठी नियुक्त असलेल्या अधिकारी/कर्मचारी व्यक्ती व्यतिरिक्त इतर व्यक्तींना वैध ओळखपत्र असलयाशिवाय प्रवेश करणेस प्रतिबंध करण्यात येत आहे.

सदर आदेश हे निवडणूकीच्या कामकाजासाठी नियुक्त्त अधिकारी/कर्मचारी यांना लागु राहणार नाहीत.सदर आदेश हे निवडणूकीची कामे हाताळतांना कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये म्हणुन दिनांक २३ नोव्हेंबर, २०२४ रोजी सकाळी ५.०० वा. पासून ते मतमोजणीची प्रक्रिया संपेपर्यंत अंमलात राहणार असल्याचे जिल्हादंडधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# आमदार प्रकाश सोळंके यांच्या विजयासाठी कार्यकर्त्यांचे साईबाबाला साकडे

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

नुकत्याच विधानसभा निवडणुका संपन्न झाल्या. बीड जिल्ह्यातील माजलगाव ची विधानसभा मतदारसंघाची निवडणूक अत्यंत चुरशीची व हाय व्होल्टेज पार पडली. महायुतीचे उमेदवार प्रकाश दादा सोळंके यांचा या निवडणुकीत विजय व्हावा यासाठी मतदारसंघातील कार्यकर्ते शिर्डीतील साईबाबांच्या चरणी साकडे घालण्यासाठी गेले आहेत.



मतदार संघातील धारूर तालुक्यातील हिंगणी बुद्रुक येथील कार्यकर्ते सुंदर सोळंके,शुभम सोळंके, भागवत सोळंके,विष्णू सोळंके, परिक्षीत नायगावकर हे निवडणूक मतदान प्रक्रिया पार पडल्यानंतर शिर्डी येथील साईबाबांना नतमस्तक होत माजलगाव विधानसभा मतदारसंघाचा सार्वभौम विकास करणारे आमदार प्रकाशदादा सोळंके हे विजयी व्हावेत यासाठी साकडे घालत आहेत.

तळागाळातील कार्यकर्त्यांसह जनतेच्या सर्व सुखदुःखात आमदार प्रकाशदादा हिरारीने सहभागी होतात. कुठल्याही कामात दुजाभाव न करता सर्व जाती धर्मातील जनतेला समान न्याय देणाऱ्या आमदार प्रकाश दादांना पाचव्यांदा आमदार करून कॅबिनेट मंत्रीपद मिळावे अशी अपेक्षा असल्याचे कार्यकर्ते सुंदर सोळंके यांनी माध्यमांना सांगितले.

# चेक बाउन्स प्रकरणी आरोपीस १३ लाख रू दंड व सहा महिने शिक्षा-ॲड.शशिकांत सावंत

**बीड । प्रतिनिधी**

फिर्यादी बाजीराव भीमराव सानप यांनी मा. मुख्यालय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या न्यायालयामध्ये फिर्याद दाखल केली होती की त्यांना आरोपी बबन श्रीरंग पवार यांनी वादातील धनादेश त्यांच्या व्यवहारिक कारणास्तव दिला होता सदर धनादेश न वटता बँकेने सदरचा झाल्यास अनादरीत झाल्याबाबत पत्र दिले होते त्या अनुषंगाने बाजीराव विरुद्ध बबन कलम १३८ निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट एक्ट अन्वये खटला चालला सदर खटल्यामध्ये आरोपी बबन श्रीरंग पवार यांनी सदरचा धनादेश हा फिर्यादीला कायदेशीर देयका पोटी दिला होता व सदर धनादेश हा अनादर झाल्या प्रकरणी मा. मुख्य न्याय दंडाधिकारी साहेब बीड यांच्या



न्यायालयामध्ये खटला क्रमांक १२६३/२०१३ आरोपीच्या विरोधामध्ये चालला त्या खटल्यामध्ये मा. आरोपीस दोशी धरून तेरा लाख रुपये दंड व सहा महिने शिक्षा अशी शिक्षा ठोटावली... ... धनादेशाच्या डबल रक्कम दंड कदाचित न्यायालयाचा हा पहिला निकाल असेल.. फिर्यादीच्या वतीने.... शशिकांत सावंत यांनी बाजू मांडली... त्यांना त्यांचे सहकारी . अभिषेक बहिर, माऊली डाके, योगेश भांडवले, प्रदीप दराडे यांनी सहकार्य केले.

# शेतकऱ्यांनी सीसीआय केंद्रावरच हमीभावाने कापूस विकून नुकसान टाळावे - धनंजय गुंदेकर

### बीड येथे सीसीआय कडून कापूस खरेदी सुरु

**बीड । प्रतिनिधी**

सीसीआय कडून कापूस खरेदी बीड येथे सुरू झालेली असून सिध्दी जिनिंग अँड प्रेसिंग हनुमान नगर, बीड येथे हे केंद्र देण्यात आलेले आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांनी सीसीआय कापूस खरेदी केंद्रावर हमीभावाने कापूस विक्री करून आपले नुकसान टाळावे असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती, संचालक धनंजय गुंदेकर यांनी केले आहे. शेतकऱ्यांना याबाबत चौकशी करायची असेल तर बाजार समितीचे सीसी



आयकडील कर्मचारी श्री टेकाळे ९७६७४३०५९७ यांच्याशी संपर्क करावे असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

सर्व कापूस धारक शेतकरी बांधवांना कापूस घेऊन विक्री साठी घेऊन येण्याच्या आगोदर महत्वाच्या सूचना.

१) कापूस केंद्रावर थेट कापूस घेऊन न येता डिजिटल सातबारा (ज्यावर २०२४/२५ चा कापूस पीक पेरा असेल व आधार कार्ड घेऊन

◀◀ पान ३ वर

# मतमोजणीमुळे छत्रपती संभाजीनगर रस्त्यावरील वाहतुकीत बदल

**जालना । प्रतिनिधी**

जिल्ह्यात जालना विधानसभा मतदारसंघ- १०१ मतदारसंघाची मतमोजणी शनिवार दि. २३ नोव्हेंबर २०२४ रोजी जालना येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत पार पडणार आहे. तसेच बदनापुर विधानसभा (अ.जा.) मतदारसंघाची बदनापुर येथील कृषी महाविद्यालय मतमोजणी सकाळी ७ वाजेपासुन फेरनिहाय मतमोजणी संपेपर्यंत चालणार आहे. रस्ता मोकळा रहावा व रस्त्यावर वाहने उभी राहुन मार्गात अडथळा निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, या दृष्टीने वाहतुकीच्या नियमनासाठी महाराष्ट्र पोलीस अधिनियम



१९५१ चे कलम ३६ अन्वये या मार्गावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे. असे आदेश पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी जारी केले आहेत.

### नियमाचे पालन करा पो. अधीक्षक बन्सल

छत्रपती संभाजीनगरकडुन येणारी व ग्रेडर टी पॉइंट पासुन ते छत्रपती संभाजीनगर जाणारी वाहतुक ही हॉटेल इंद्रायणी चौक चंदनझिरा पासुन ते ग्रेडर टि पॉईट पर्यंत छत्रपती संभाजीनगर ते जालना हायवे रोडवरुन एक मार्गी म्हणजे जालना ते छत्रपती संभाजीनगर जाणाऱ्या रस्त्याने येईल व जाईल.

जालना ते छत्रपती संभाजीनगर, जालना एमआयडीसीकडे जाणारी वाहतुक ही ग्रेडर टी पॉईटपासून ते हॉटेल इंद्रायणी चौक चंदनझिरापर्यंत जालना ते छत्रपती संभाजीनगर हायवे रोडने एकमार्गी जाईल व येईल.

जालना ते छत्रपती संभाजीनगरकडे जाणारी व छत्रपती संभाजीनगरकडुन जालनाकडे येणारी वाहतुक बदनापुर ते सोमठाणा फाटा व सोमठाणा फाटा ते बदनापुर अशी एक मार्गी म्हणजे जालना ते छत्रपती संभाजीनगर जाणाऱ्या रस्त्याने येईल व जाईल. हा आदेश दि.२३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी ५ वाजेपासुन मतमोजणी संपेपर्यंत अंमलात राहील. असेही आदेशात नमुद केले आहे.

# पैसे वाटप प्रकरणावरुन विनोद तावडेंची राहुल गांधींसह काँग्रेस नेत्यांना नोटीस

**मुंबई । प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकांच्या मतदानाच्या एक दिवस अगोदर भाजप नेते विनोद तावडे यांच्यावर पैसे वाटपाचा आरोप करण्यात आला होता. विरार-नालासोपारामध्ये भाजप आणि बहुजन विकास आघाडी यांच्यात वाद झाला. विरारमधील एका हॉटेलात पैसे वाटप केल्याचा आरोप बहुजन विकास आघाडीच्या हितेंद्र ठाकूर यांच्याकडून करण्यात आला होता. विवांत हॉटेलमध्ये भाजपचे () उमेदवार राजन नाईक आणि भाजपचे काही पदाधिकारी



हॉटेलमध्ये आले होते. येथील हॉटेलमध्ये बैठक सुरू असताना, बविआचे काही कार्यकर्ते हॉटेलमध्ये आले. त्यानंतर, बविआकडून पैसे वाटप केल्याचा आरोप करण्यात आला, विशेष म्हणजे याठिकाणी रोख रक्कमही जप्त करण्यात आली होती. त्यावरुन राजकीय वातावरण चांगलंच तापलं होतं. तर, काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांसह महाविकास आघाडीच्या नेत्यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला होता. आता, विनोद तावडे यांनी याप्रकरणी काँग्रेस नेत्यांना नोटीस बजावली आहे. माफी मागा, अन्यथा १०० कोटी रुपयांचा दावा ठोकणार असल्याचं तावडे यांनी नोटीसमध्ये म्हटलं आहे.

विरार येथील हॉटेल विवांतमध्ये घडलेल्या प्रकरणावर विनोद तावडे यांनी प्रतिक्रिया दिली होती. मी इथल्या कार्यकर्त्यांना मतदानासंदर्भात माहिती द्यायला आलो होतो. बहुजन विकास आघाडीच्या लोकांचा गैरसमज झाला, की मी पैसे आणले. त्यांनी सगळं तपासलं पण काहीच पैसे मिळाले नाही, त्यांनी सीसीटीव्ही फुटेज तपासावे. सगळं गैरसमजातून झालं,

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...

पुणे विशेष

शनिवार, दि.२३ नोव्हेंबर २०२४ । पान ७

# मतमोजणीनिमित्त पुणे शहरात कडेकोट बंदोबस्त; तब्बल हजारो पोलीस असणार तैनात

पुणे । प्रतिनिधी

विधानसभा निवडणूकीच्या मतमोजणीनिमित्त शहरात कडेकोट बंदोबस्त तैनात केला असून, ३ हजार पोलिसांचा फौजफाटा ठेवण्यात आला आहे. शहरात कोथरूड, पर्वती, शिवाजीनगर, कसबा, वडगाव शेरी, हडपसर, कॉन्टेमेंट तसेच खडकवासला या आठ मतदारसंघाची निवडणूकीची मतमोजणी होणार आहे. कोरेगाव पार्क येथील एफसीआय गोडाऊन येथे सकाळी आठपासून मतमोजणी सुरू होत आहे. पुणे पोलिसांच्या कडेकोट




बंदोबस्तात निवडणूक प्रक्रिया शांततेत पार पडली. मतदानाचा दिवस देखील शांततेत पार पडला. दरम्यान, उद्या मतमोजणी होत आहे. यानिमित्ताने शहरात तीन हजार पोलिसांचा फौजफाटा तैनात करण्यात आला आहे. त्यासोबतच काही सूचना देखील पुणे पोलिसांकडून करण्यात आलेल्या आहेत.

असा आहे बंदोबस्त

अप्पर पोलीस आयुक्त- ४

पोलीस उपायुक्त- ११

सहाय्यक आयुक्त- १९

पोलीस निरीक्षक, सहाय्यक निरीक्षक व उपनिरीक्षक- ३५०

पोलीस अंमलदार- २५०

केंद्रीय सशस्त्र पोलीस बल- १२ कंपनी

राज्य राखीव पोलीस बल- २ कंपनी

प्रतिबंधात्मक आदेश

मतमोजणीच्या २०० मिटर परिसरात इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे तसेच ज्वलनशील पदार्थ किंवा हत्यारे घेऊन जाण्यास व बाळगण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यासोबत फोटो किंवा व्हिडीओ काढण्यासाठी मनाई असणार आहे. तर, ५ किंवा त्या पेक्षा जास्त लोकांनी एकत्रित येऊन बेकायदेशी जमाव जमवू नये, असेही आदेशात म्हंटले आहे.

**मतदान मोजणी परिसर नो-पार्किंग झोन**

मतमोजणीनिमित्ताने केंद्रासमोरील साऊथ मेन रोडवर पुर्वेस लेन नं. ५ तसेच जक्शन पश्चिमेस ले नं. २ जंक्शनपर्यंत आणि लेन नंबर ३ व ४ वर २०० मीटरपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना नो पार्किंग झोन करण्यात आला आहे.

# दुचाकीवरील तरुण-तरुणी टेम्पोच्या धडकेत ठार

जेजुरी

टेम्पो व दुचाकीमध्ये झालेल्या धडकेत दुचाकीवरील तरुण-तरुणी जागीच ठार झाले. बेल्हे-जेजुरी महामार्गावर मंगरूळ येथील कुकडी नदीच्या वळणावर गुरुवारी (दि. २१) सकाळी सव्वासात वाजण्याच्या सुमारास हा अपघात झाला. याप्रकरणी आळेफाटा पोलिस ठाण्यात टेम्पोचालकाविरोधात गुन्हा दाखल केला आहे.रत्नाकर श्रीमंत गायकवाड (वय ३६, रा. कोंढवा, पुणे), आरती राजू माने (रा. जुनी सांगवी, पुणे) अशी या अपघातात ठार झालेल्या तरुण-तरुणीची नावे आहेत.





पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, रत्नाकर व आरती हे दोघे पुण्यावरून शिर्डीला देवदर्शनासाठी दुचाकीवरून (एमएच १२ एसएस ९२९२) जात होते. मंगरूळ येथील कुकडी नदीच्या वळणावर समोरून येणार्या टेम्पोने (एमएच १५ डीके ५०८८) दुचाकीला धडक दिली. यामध्ये रत्नाकर व आरती हे दोघे चिरडले गेले. त्यात गंभीर जखमी झाल्याने दोघांचा जागीच मृत्यू झाला. या अपघाताची माहिती मिळताच घटनास्थळी आळेफाटा पोलिस दाखल झाले. पोलिसांनी टेम्पोचालकाला ताब्यात घेत त्याच्यावर गुन्हा दाखल केला. आळेफाटा पोलिस पुढील तपास करत आहेत.

# ऐन निवडणूकीच्या धामधूमीत ३ बोकड अन् १ शेळी चोरीला; आजींची पोलीस ठाण्यात धाव

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे शहरात विधानसभा निवडणूकांची धामधुम सुरू असतानाच आजींचे ३ बोकड अन् १ शेळी चोरीला गेल्याची घटना समोर आली असून, या घटनेने पुण्यात चांगलीच खमंग चर्चा रंगली आहे. आजींनी बोकड अन् शेळी न मिळाल्याने हडपसर पोलिसांकडे धाव घेतली आहे. बोकड व शेळी चोरीची तक्रार देखील दिली आहे. आता पोलिसांनी घटनेच्या ७ दिवसानंतर या प्रकरणात बोकड व शेळी चोरीप्रकरणी गुन्हा नोंदवत शोध सुरू केला आहे.

याप्रकरणी ६२ वर्षीय ज्येष्ठ महिलेने हडपसर पोलिसांत तक्रार



दाखल केली आहे. त्यानूसार, अज्ञातांवर चोरीचा गुन्हा नोंदवला आहे.

पुण्यातील चोरटे स्मार्ट तर आहेतच पण दिवसेंदिवस हे चोरटे काय-काय चोरून नेतील याचाही भरोसा राहिलेला आहे. कधी ड्रायफूट तर कधी बर्फी-पेढा आणि ब्रँडेड कपडे देखील चोरून नेले जात असल्याच्या घटना यापुर्वी घडल्या आहेत. पण, ऐन निवडणूकीत बोकड व शेळी चोरीला गेल्याने या घटनेची शहरभर खमंग चर्चा सुरू झाली आहे. हडपसरमधील गोंधळेनगर परिसरात या आजी राहण्यास आहेत. त्यांच्या घराच्या परिसरात कॅनोलचा परिसर आहे. या कॅनोललगत त्यांनी त्यांचे तीन बोकड आणि १ शेळी १२ नोव्हेंबर रोजी नेहमीप्रमाणे दोरीने बांधून ठेवले होते. मात्र, दुसऱ्या दिवशी त्या सकाळी बोकड व शेळी सोडण्यास गेल्या असता त्यांना तेथे नसल्याचे दिसून आले. त्यांनी शोधाशोध केली. पण ते मिळाले नाही. नंतर त्यांनी पोलिसांकडे धाव घेतली. आता याप्रकरणात पोलिसांनी सात दिवसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# निकालाच्या आदल्या दिवशी पुण्यात निघाले कोयते; टोळक्याचा दहशत माजवण्याचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

वानवडीतील भैरोबानाला चिमटा वस्ती परिसरात टोळक्याने कोयते उगारुन मोटार, रिक्षा, टेम्पो, दुचाकी अशा नऊ वाहनांची तोडफोड केली. याप्रकरणी पोलिसांकडून चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला.

भैरोबा नाला परिसरातील चिमटा वस्ती मयुर उत्तम गायकवाड (वय ३२, रा. चिमटा वस्ती, भैरोबानाला पुणे-सोलापूर रस्ता, वानवडी) यांनी वानवडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. गुरुवारी पहाटे दोनच्या सुमारास टोळके वस्तीत शिरले. त्यांच्याकडे कोयते आणि दांडके होते.




कोयते आणि दांडके उगारुन टोळक्याने दहशत माजविली. या भागातील वाहनाच्या काचा फोडल्या तसेच त्यांचे गाडीचे शेजारी मागे व पूढे पार्क केलेली रिक्षा, फोर्ड कार, जेट्स कार, टेम्पो, ॲक्टिव्हा दुचाकी या सर्व वाहनाच्या काचा फोडुन नुकसान केले. त्यानंतर टोळक्याने रहिवाशांना शिवीगाळ केली यामुळे नागनाथ गांधले, अशोक काशिकार, मयुर गायकवाड, योगेश घोडके, प्रसाद लोणारे, रमेश ढगे, प्रमोद आव्हाडे असे घराबाहेर जमा झाले. त्यावेळी टोळक्याने त्यांचेकडील कोयता, लाकडी दांडके व लोखंडी रॉड हवेत फिरवुन आम्ही येथील भाई आहोत,मध्ये आला तर जिवे ठार मारु अशी धमकी दिली. त्या ठिकाणावरुन कॅनॉलच्या दिशेने पसार झाले. पसार होताना टोळक्याने या भागातील कालव्याजवळ लावलेली दुचाकी आणि रिक्षाची तोडफोड केली. या घटनेची सहायक फौजदार कुंभार तपास करत आहेत. तसेच टोळक्याने घोरपडीमध्ये कोयत्याने हल्ला करून तिघेजण गंभीर जखमी केले आहे. गुन्हे अन्वेषण विभागाने तीन आरोपींना ताब्यात घेतले असून आणखी एकाचा शोध घेतला जात आहे.

# पुणे जिल्ह्यातील २१ विधानसभा मतदार संघात ५०६ टेबलावर मतमोजणी

**पुणे । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीची मतमोजणी उद्या (२३ नोव्हेंबर) होत असून २१ विधानसभा मतदार संघातील मतमोजणीसाठी मतदारसंघनिहाय ईव्हीएम मतमोजणीसाठी ३९१ आणि टपाली तसेच ईटीपीबीएस मतमोजणीसह एकूण ५०६ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी दिली आहे.

जिल्ह्यात मतमोजणीच्या सर्वाधिक ३० इतक्या फेऱ्या पुरंदर विधानसभा मतदार संघात होणार आहेत. तर बारामती मतदार संघात सर्वाधिक ३० टेबल ठेवण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील सर्व मतदार संघात मिळून ईव्हीएम मतमोजणीसाठी ३९१, टपाली मतमोजणीसाठी ८७ तर ईटीपीबीएससाठी २८ टेबलची व्यवस्था करण्यात आली आहे. जुन्नर व आंबेगाव मतदार संघात ईव्हीएम मतमोजणीसाठी प्रत्येकी १८ टेबल, टपाली



मतपत्रिकांसाठी ६ तर ईटीपीबीएस मतमोजणीसाठी अनुक्रमे १ व २ टेबल ठेवण्यात येणार असून २० फेऱ्या होणार आहेत. खेड आळंदी- ईव्हीएम मतमोजणीसाठी २०, टपाली- ४, ईटीपीबीएस- २ टेबल- २० फेऱ्या, शिरुर- ईव्हीएम मतमोजणीसाठी २४, टपाली- ४, ईटीपीबीएस- २ टेबल- २४ फेऱ्या, दौंड- ईव्हीएम मतमोजणीसाठी १४, टपाली- ५, ईटीपीबीएस- १ टेबल- २३ फेऱ्या, इंदापूर- ईव्हीएम मतमोजणीसाठी १४, टपाली- ६, ईटीपीबीएस- १ टेबल- २४ फेऱ्या अशी व्यवस्था करण्यात आली आहे.

# विजेचा धक्का लागून सहा वर्षीय मुलीचा मृत्यू

कर्जत, - नेरळ गावातील खांडा भागात विजेचा धक्का लागून सहा वर्षीय मुलीचा मृत्यू झाला आहे. आईवडिलांसह आईस्क्रीम खात असताना बाजूला असलेल्या सरबताचा गाडीला टेकल्यावर सहा वर्षीय रायमिन खान हिचा विजेचा धक्का लागून मृत्यू झाला.

कल्याण-कर्जत रस्त्यावरील खांडा गावच्या हद्दीतील टीवाले हॉटेल जवळ एक आईस्क्रीम आणि सरबताची गाडी लागलेली असते. त्यातील आईस्क्रीमच्या गाडीवर आईस्क्रीम खाण्यासाठी नेरळ पूर्व भागातील रहिवासी रफिक खान हे कुटुंबासह २० नोव्हेंबरच्या रात्री साडेनऊ वाजता गेले होते. त्यावेळी रफिक यांची मुलगी रायमिन हि आईस्क्रीम खात असताना तिचा हात आईस्क्रीमच्या गाडीशेजारील सरबताचा गाडीला लागला. सरबताची गाडीवरील सर्व साहित्य रात्रीची वेळ असल्याने बंद होते. मात्र गाडीमधील फ्रिज सुरु होता. शितपेय असल्याने फ्रिज सुरु होता. त्या फ्रिजला स्पर्श झाल्याने सहा वर्षीय रायमिन सरबताच्या गाडीला चिकटली. त्यानंतर स्थानिक रहिवाशी आणि पालकांनी तिचा खेचून काढली व त्याच अवस्थेत रुग्णालयात नेले. डॉक्टरांनी तपासणी केली असता, तिचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर पालक रफिक खान यांनी नेरळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या घटनेची नोंद आकस्मिक मृत्यू अशी करण्यात आली असून प्राथमिक आरोग्य केंद्रात शव विच्छेदन करून मुलीचा मृतदेह पालकांकडे सुपूर्द करण्यात आला आहे. या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# घोरपडीत पूर्वीच्या वादातून तरुणाच्या खुनाचा प्रयत्न

**पुणे । प्रतिनिधी**

पूर्वीच्या वादातून तिघांनी एका तरुणावर कोयत्याने वार करत खुनाचा प्रयत्न केला. या वेळी वाद सोडविण्यासाठी आलेल्या तरुणाच्या दोन मित्रांनादेखील मारहाण करण्यात आली आहे.

याप्रकरणी, मुंढवा पोलिसांनी महेश गजसिंह आणि त्याच्या तीन साथीदारांच्या विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत तुषार मेमाणे यांनी फिर्याद दिली. तर अजय पवार (वय ३१), अमित परदेशी (वय २६), सोहेश अलमले (वय २६) अशी जखमी झालेल्यांची नावे आहेत. ही घटना गुरुवारी (दि.२१) मध्यरात्री बी. टी. कवडे रोड घोरपडी परिसरात घडली आहे.

फिर्यादी मेमाणे हे त्यांचे मित्र अमित परदेशी, अजय पवार, विनायक म्हेत्रे यांचेसह जेवण करण्यासाठी परदेशी यांच्या चारचाकी गाडीतून गेले होते. परत आल्यानंतर बी. टी. कवडे रोड येथे गप्पा मारत थांबले होते. त्यावेळी परदेशी याचे मित्र सोहेश अलमले आणि इतर आले होते. त्यावेळी आरोपी गजसिंह हा त्याच्या दोन- तीन साथीदारांसोबत तेथे आला.

पूर्वीच्या वादातून आरोपींनी अमित परदेशी याच्या डोक्यात वार करून गंभीर जखमी केले. तर फिर्यादी मेमाणे यांना हाताने व उलट्या कोयत्याने मारहाण केली. तसेच सोहेश याच्या कानाजवळ वार करून जखमी केले. गजसिंह याने अजय पवार याच्या डोक्यात, मानेवर, पाठीमध्ये, दोन्ही पायावर वार करून गंभीर जखमी केले. सहायक पोलीस निरीक्षक संदीप जोरे तपास करत आहेत.

# नारायणगावातील विद्यार्थ्यांना घडली अंतराळाची सफर




नारायणगाव । प्रतिनिधी

अंतराळातील घडामोडीची विद्यार्थ्यांना वैज्ञानिक माहिती देऊन अंतराळ सफारीचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने 'इस्रो' या भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने वैज्ञानिक अंतरिक्ष महायात्रा या उपक्रमाचे आयोजन येथील ग्रामोन्नती मंडळ संचलित श्री अनंतराव कुलकर्णी इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये केले होते. भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने तयार केलेल्या बस (उपग्रह प्रक्षेपण वाहन) प्रयोगशाळेद्वारे विद्यार्थ्यांना अंतराळातील घडामोडीची शास्त्रीय माहिती दिली. या सफारीचा अनुभव परिसरातील सुमारे तीन हजार विद्यार्थ्यांनी घेतला.

याचे नियोजन पुणे येथील विज्ञानभारती संस्था व श्री अनंतराव कुलकर्णी इंग्लिश मीडियम स्कूलने केले होते. याबाबत मुख्याध्यापिका अनघा जोशी म्हणाल्या की, वैज्ञानिक माहितीच्या आधारे अंतराळ सफरीचा अनुभव विद्यार्थ्यांना घेता यावा, त्यांच्यामधील वैज्ञानिक दृष्टिकोन वाढीस लागावा, भावी शास्त्रज्ञ तयार व्हावेत या उद्देशाने इस्रो या भारतीय अंतराळ संशोधन संस्थेने अंतरिक्ष महायात्रा या उपक्रमाचे आयोजन केले होते. केंद्र सरकारचा उपक्रम असलेल्या इस्रोने त्यासाठी एक खास बस तयार केली असून विद्यार्थ्यांना बसच्या माध्यमातून सॅटेलाईट लॉन्च व्हेईकल (उपग्रह प्रक्षेपण वाहन), चांद्रयान १, २, ३ तसेच मंगळयान, गगन यान मोहिमांची माहिती विद्यार्थ्यांना दिली. उपग्रहाचा शेती, टेलिव्हिजन, टेलिफोन, मोबाईल जीपीएस साठी कसा वापर केला जातो? आदी माहिती विज्ञान भारतीच्या मीना माळगावकर, अक्षय मानकर, कृष्णा सुरडकर यांनी दिली. या कार्यक्रमाचे उद्घाटन ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष अनिल मेहेर यांनी केले. यावेळी डॉ. आनंद कुलकर्णी, प्रकाश पाटे, शिक्षणाधिकारी अनिता शिंदे, केंद्रप्रमुख दिनेश मेहेर, सीमा कुलकर्णी, वैशाली पुंडे आदी उपस्थित होते. यानिमित्ताने विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजूषा, घोषणा वाक्य, पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन केले होते. बक्षीस वितरण ग्रामोन्नती मंडळाच्या विश्वस्त मोनिका मेहेर, रमा मेहेर यांच्या हस्ते केले.

# मावळमधील प्रसिद्ध बैलगाडा मालकाचे अपहरण करुन खून

वडगाव मावळ, - मावळ तालुक्यातील प्रसिद्ध बैलगाडा मालक पंडीत जाधव यांचे अपहरण करून खून केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. आरोपींनी पंडीत जाधव यांचा खून केल्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी त्यांचा मृतदेह जाळून त्याची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर त्यांचे अपहरण खंडणीसाठी झाल्याचा बनाव रचला. खंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथक गुन्हे शाखेने आरोपीला ताब्यात घेऊन गुन्हा उघडकीस आणला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण यांना पंडीत रामचंद्र जाधव (वय ५२ वर्षे, रा.मु. जाधववाडी डॅमजवळ, पो.नवलाख उंब्रे ता.मावळ) हे दिनांक १४ नोव्हेंबरपासून बेपत्ता असल्याचे आणि त्यांच्या व्हॉट्सॲपवरुन कुटुंबीयांकडे ५० लाखांची



खंडणी मागितली जात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक चव्हाण यांनी पथकासह बेपत्ता पंडीत जाधव यांच्या कुटुंबीयांची भेट घेतली. पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण करुन आणि परीसरातील सीसीटीव्ही कॅमेरे तपासले. त्यावेळी मिळालेल्या माहितीनुसार सुरज वानखेडे याच्या हालचाली संशयास्पद वाटल्याने त्याला ताब्यात घेतले व चौकशी केली. आरोपी सुरज मच्छिंद्र वानखेडे (वय २३ वर्षे, सध्या रा. पंडीत जाधव यांच्या खोलीत, मु. जाधववाडी, पो. नवलाख उंब्रे, ता. मावळ) हा गावी पळून जाण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी त्याला बधलवाडी नवलाख उंब्रे (ता. मावळ) येथून ताब्यात घेतले. त्याची कसून चौकशी केली असता गुन्ह्याचा उलगडा झाला. आरोपीने त्याच्या मित्र रणजीत कुमार (रा. बिहार) याच्या साथीने प्रसिद्ध गाडा मालक पंडीत रामचंद्र जाधव (वय ५२ वर्षे) यांचे अपहरण करुन वैयक्तिक कारणास्तव खून केला. त्यानंतर मृतदेहाची विल्हेवाट लावण्याचा प्रयत्न केला. तसेच कुणाला संशय येऊ नये यासाठी पंडीत जाधव यांचे अपहरण खंडणीसाठी झाल्याचा बनाव रचला. खंडणी विरोधी पथकाकडून हा गंभीर गुन्हा उघड करण्यात आला असून आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेले पाच सिमकार्ड व दोन मोबाईल जप्त करण्यात आले आहेत. नमुद गुन्ह्यात खून करुन पुरावा नष्ट करणे याप्रमाणे कलमवाढ करण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास तळेगांव एमआयडीसी पोलीस करीत आहे. ही कारवाई वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, पोउपनि सुनिल भदाणे, हवा सुनिल कानगुडे, प्रदिप पोटे, किरण काटकर, प्रदिप गोंडाबे, किशोर कांबळे, किरण जाधव, अशिष बोटके व पथकाने केली.

# बारामतीत मतमोजणीसाठी प्रशासन सज्ज

**बारामती । प्रतिनिधी**

विधानसभा मतदारसंघाची मतमोजणी शनिवारी (ता. २३) सकाळी आठ वाजता वखार महामंडळ गोदामात होणार असून, त्याकरिता प्रशासन सज्ज असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी वैभव नावडकर यांनी दिली.

नावडकर म्हणाले, मतमोजणीसाठी ३०० कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली आहे. ईव्हीएम मतमोजणीकरिता २० टेबल, पोस्टल बॅलेट मतमोजणी करिता ८, तर ईटीपीबीएससाठी २ टेबल लावण्यात आले आहेत. प्रथम टपाली मतपत्रिका मोजणी सकाळी ८ वाजता सुरू होईल. साडेआठला ईव्हीएम मोजणीला सुरुवात होईल.मतमोजणीच्या २० फेऱ्या होणार आहेत. मतमोजणी प्रक्रियेत कुठलाही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी चोख पोलिस बंदोबस्त असेल. यामध्ये एक उपविभागीय पोलिस अधिकारी, २ पोलिस निरीक्षक, १२ पोलिस अधिकारी, ७८ पुरुष पोलिस कर्मचारी, २६ महिला पोलिस कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. याव्यतिरिक्त बीएसएफ, हरियाना एसआरपीएफ, राज्य एसआरपीएफ मदतीला असतील.

# मयूरसिंह पाटील यांना जिवे मारण्याची धमकी; इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल

**इंदापूर । प्रतिनिधी**

: निवडणूक आयोगाकडे व पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार दिली म्हणून शिवीगाळ, दमदाटी करत जिवे मारण्याची धमकी इंदापूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती मयूरसिंह पाटील यांना दिल्याने इंदापूर पोलीस ठाण्यात बावडा (ता. इंदापूर) येथील दोघांवर गुन्हा दाखल करण्यात आला.

दशरथ घोगरे व दादासाहेब घोगरे (रा. बावडा) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत इंदापूर पोलीस ठाण्यात बाजार समितीचे माजी सभापती मयूरसिंह अरुणराव पाटील यांनी फिर्याद दिली आहे. संबंधित दोघा जणांनी निवडणूक आयोगाकडे व गटविकास अधिकारी यांच्याकडे तक्रार का दिली असे म्हणून शिवीगाळ व दमदाटी करून जिवे मारण्याची धमकी दिली, अशा आशयाची फिर्याद पाटील यांनी इंदापूर पोलीस ठाण्यात दिली आहे, त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, गुरुवारी (दि. २१) मयूरसिंह पाटील यांच्यावर हल्ला व जिवे मारण्याचे धमकी दिल्याची वार्ता इंदापूर तालुक्यात पसरली होती. परिवर्तन विकास आघाडीचे उमेदवार प्रवीण माने, शरद चितारे, बाबसाहेब चवरे आदींनी याबाबत पोलिसांना निवेदन देत कारवाईची मागणी केली.